कृषीवल

१९३७-२०२६ वर्ष ९०

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | सोमवार । दि. २३ नोव्हेंबर २०२६ । अंक १६७ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

शेतकऱ्यांसाठी रोहित पवारांचा ट्रॅक्टर मोर्चा

नागपूर : राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी आणि शेतमजुरांच्या प्रश्नांवरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सरकारविरोधात आंदोलनाची घोषणा केली आहे. शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत ४ ते ९ डिसेंबरदरम्यान शेगाव ते नागपूर असा 'न्याय्यहक्क ट्रॅक्टर मोर्चा' काढण्यात येणार आहे. हजारो शेतकऱ्यांचा हा मोर्चा नागपुरातील विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनावर धडकणार असल्याचे आ. रोहित पवार यांनी सांगितले.

सोने-चांदी आणखी स्वस्त

मुंबई : सोने आणि चांदीच्या दरातील घसरणीचे सत्र कायम असून रविवारी (दि. २२) सराफा बाजारात सोन्याचे दर आणखी खाली आले. मुंबईतील संदर्भ दरानुसार २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम १ लाख २७ हजार १९६ रुपये, तर २२ कॅरेट सोन्याचा भाव १ लाख १६ हजार ५१२ रुपये नोंदवण्यात आला. चांदीचा दर प्रतिकिलो १ लाख ५४ हजार ५४८ रुपयांवर आला आहे. गेल्या आठवड्यात सोन्याच्या दरात प्रति १० ग्रॅम १२ हजार ५४० रुपयांची, तर चांदीच्या दरात प्रतिकिलो २० हजार रुपयांची घसरण झाली आहे.

वेधक

छळाला कंटाळून तरुणीची आत्महत्या

नागोठणे : प्रियकराकडून होणारी मारहाण, शिवीगाळ आणि मानसिक छळाला कंटाळून ३१ वर्षीय तरुणीने तणनाशक प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. मोहिनी हरेश पाटील असे मृत तरुणीचे नाव असून, उपचारादरम्यान १९ नोव्हेंबर रोजी तिचा मृत्यू झाला. याप्रकरणी प्रियकर शैलेश होनाजी भोईर (रा. कोलेटी, ता. पेण) याच्याविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, मोहिनी आणि शैलेश जून २०२६ पासून खारढोंबी येथे भाड्याच्या घरात एकत्र राहात होते. या काळात शैलेश तिच्याशी वारंवार भांडण करून शिवीगाळ व मारहाण करीत असे. तसेच औषध घेऊन मर, असे सांगून तिचा छळ करीत असल्याचा आरोप आहे. •➤पान २ वर

रायगड थंडीने गारठला

अलिबाग : नोव्हेंबरचा उत्तरार्ध सुरू होताच रायगड जिल्ह्यात थंडीची चाहूल जाणवू लागली आहे. पहाटेच्या वेळी हवेत गारवा वाढत असून, रात्रीही थंडीची जाणीव होऊ लागली आहे. सकाळी घराबाहेर पडणारे नागरिक, मॉर्निंग वॉकसाठी जाणारे ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वारांना थंडीचा अनुभव येत आहे. दिवसा उन्हाचा चटका आणि सकाळ-संध्याकाळचा गारवा अशा बदलत्या हवामानामुळे जिल्ह्यात थंडीचे आगमन होत असल्याचे चित्र आहे. गेल्या काही दिवसांपासून हवामानात बदल जाणवत असून, पहाटेच्या वेळी गार वारे वाहात आहेत. सकाळी उशिरापर्यंत हवेत थंडावा टिकून राहात आहे. रात्रीच्या वेळीही तापमानातील फरकामुळे थंडीची जाणीव वाढत आहे. त्यामुळे नागरिकांकडून •➤पान २ वर

टोरंटच्या जंगलतोडीविरोधात कर्जतकरांचा एल्गार

- प्रकल्प रद्द करण्यासाठी हजारोंचा सह्यांचा लढा
- सर्वपक्षीय नेते, पर्यावरणप्रेमी आणि नागरिक रस्त्यावर



। नेरळ । प्रतिनिधी ।

सायडोंगरातील हजारो झाडांची कत्तल, धरणांच्या नावाखाली जंगलांवर घाव आणि पर्यावरणाचा वाढता ऱ्हास... या सगळ्याविरोधात आता संपूर्ण कर्जत तालुका एकवटला आहे. टोरंटचा प्रस्तावित प्रकल्प रद्द करण्याच्या मागणीसाठी कर्जत पर्यावरण बचाव समितीने रविवारी दि. २२ पुकारलेल्या सह्यांच्या मोहिमेला हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे, सर्वपक्षीय राजकीय कार्यकर्ते, पर्यावरणप्रेमी आणि सर्वसामान्य नागरिकांनी एकत्र येत प्रकल्पाविरोधातील लढ्याला जनआंदोलनाचे स्वरूप दिले आहे.

कर्जत येथील कपालेश्वर मंदिर परिसरात आयोजित या सह्यांच्या मोहिमेत नागरिकांनी •➤पान २ वर

> शिवसेना ठाकरे पक्षाने सर्वप्रथम घटनास्थळी जाऊन जंगलतोड रोखण्यासाठी पुढाकार घेतला. आता हा प्रकल्प रद्द झाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही.
> **– संतोष पाटील,** उपनगराध्यक्ष

> कर्जतच्या पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी आम्ही पर्यावरण बचाव समितीच्या पाठीशी ठामपणे उभे आहोत. हा लढा कोणत्याही एका पक्षाचा नसून कर्जतच्या भवितव्याचा आहे.
> **– राजेश लाड,** माजी नगराध्यक्ष

आता माघार नाही!

आमच्या आंदोलनामुळे आतापर्यंत दोन विजय मिळाले आहेत. धरणासाठी सुरू झालेली जंगलतोड थांबली, तर जनतेच्या रेट्यामुळे पोशीर रस्त्याची संयुक्त मोजणीही रद्द करावी लागली. आता टोरंट प्रकल्प सरकार कधी रद्द करणार, याची आम्ही वाट पाहात आहोत. सह्यांच्या मोहिमेतून जमा होणारे निवेदन सरकारला देणार असल्याचे कर्जत पर्यावरण बचाव समितीचे समन्वयक ॲड. कैलास मोरे सांगितले.

जंगलावर घाव घालाल, तर संघर्ष अटळ!

- टोरंट प्रकल्पाविरोधात उल्का महाजन मैदानात
- सायडोंगर ग्राम सभेत सरकारला सुनावले



। नेरळ । प्रतिनिधी ।

जंगल म्हणजे केवळ झाडांचे अस्तित्व नाही, तर आदिवासींचे जगणे, संस्कृती आणि हक्कांची ओळख आहे. विकासाच्या नावाखाली जंगल उद्ध्वस्त करून कोणाचा विकास साधणार? असा सवाल करत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांनी कर्जत तालुक्यातील टोरंट पॉवरच्या प्रस्तावित प्रकल्पाविरोधात सरकारला थेट इशारा दिला. रोजगाराच्या आश्वासनांमागे स्थानिकांची जमीन आणि जंगल हिरावून घेण्याचा प्रयत्न खपवून घेतला जाणार नाही. जंगल वाचवण्यासाठी आता संघर्ष अधिक तीव्र होईल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

सह्याद्री बचाव संघर्ष समितीच्या वतीने रविवार, दि. २२ रोजी पाली सायडोंगर येथे आदिवासी ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, नॅन्सी गायकवाड आणि जागृत कष्टकरी संघटनेचे सचिव अनिल वाघमारे व्यासपीठावर उपस्थित होते. •➤पान २ वर

जंगल, जमीन आणि हक्कांचा लढा!

टोरंटमुळे सायडोंगरच्या जंगलाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आदिवासींचे जंगलावरील पारंपरिक हक्क अबाधित ठेवावेत, स्थानिकांवर प्रकल्पासाठी सक्ती करू नये आणि रोजगाराच्या आश्वासनांआड जंगलाचा विनाश होऊ देऊ नये, अशी भूमिका ग्राम सभेत मांडण्यात आली. जंगलाच्या संरक्षणासाठी ग्रामस्थ एकवटले असून, संघर्ष तीव्र करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

रविवार ठरला घातवार!



- देशभरात सहा भीषण अपघातात ३५ जणांचा बळी
- महिला-मुलांचाही समावेश, अनेक जण गंभीर जखमी

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

सुट्टीचा रविवार अनेक कुटुंबांसाठी काळ बनून आल्याचे समोर आले आहे. देशातील विविध राज्यांत झालेल्या भीषण रस्ते अपघातांनी मृत्यूचे तांडव घातले. राजस्थान, गुजरात, हरियाणा, बिहार आणि उत्तर प्रदेशमध्ये घडलेल्या दुर्घटनांमध्ये ३५ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले. मृतांमध्ये महिला, लहान मुले आणि तरुणांचाही समावेश आहे. एकाच दिवसात घडलेल्या या अपघातांनी देशातील रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आणला आहे.

उत्तर प्रदेशातील फतेहपूर येथे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २ वर दुहेरी मजली बस आणि ट्रकची जोरदार धडक झाली. •➤पान २ वर

धोकादायक विहिरीकडे दुर्लक्ष

तेलंगे मोहल्ल्यात मृत्यूचा सापळा

। महाड । प्रतिनिधी ।

रस्त्यालगत उघडी विहीर, परिसरात अंधार आणि बाजूने सुसाट धावणारी वाहने... मृत्यूला निमंत्रण देणारे हे चित्र महाड-मंडणगड मार्गावरील तेलंगे मोहल्ल्यात दिसत आहे. विहिरीवर संरक्षक जाळी बसविण्याची वाहतूक शाखेने चार ते पाच वेळा लेखी मागणी करूनही राष्ट्रीय महामार्ग विभागाला जाग आलेली नाही. एखादे वाहन विहिरीत कोसळून निष्पापांचे बळी गेल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.



नाशिक जिल्ह्यातील इंदोरे-दिंडोरी परिसरात दरगुडे कुटुंबाची एसयूव्ही कार •➤पान २ वर

प्रशांत नाईक मित्र मंडळाचा स्तुत्य उपक्रम | ८६ रक्तपिशव्यांचे संकलन

रक्तदानातून माणुसकीचा जागर !

। अलिबाग । प्रतिनिधी ।

वाढदिवसाच्या निमित्ताने मिळणाऱ्या शुभेच्छा आणि प्रेमाला सामाजिक बांधिलकीची जोड देत प्रशांत नाईक मित्र मंडळाने रक्तदान शिबिराचे आयोजन केले. अलिबागचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्या वाढदिवसाचे औचित्या साधत आयोजित रक्तदान शिबिराला कार्यकर्त्यांसह सर्वसामान्य नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या उपक्रमातून तब्बल ८६ रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले.



प्रशांत नाईक मित्र मंडळाच्या वतीने जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग यांच्या सहकार्याने श्रीबाग येथील कच्छी भवनमध्ये सकाळी ९.३० ते दुपारी १.३० या वेळेत रक्तदान शिबीर पार पडले. वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी एकत्र येणाऱ्या मित्रपरिवाराने केवळ औपचारिक शुभेच्छांपुरते मर्यादित •➤पान २ वर





दुरुस्तीच्या नावाखाली नवी बांधकामं?

- माथेरान नगरपरिषदेच्या परवानग्यांवर संशय
- हेरिटेज मंजुरी, स्ट्रक्चरल ऑडिटचे अभिलेख गायब
- विभागीय आयुक्तांकडून चौकशीचे आदेश

| नेरळ | प्रतिनिधी |

पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील माथेरानमध्ये किरकोळ दुरुस्तीच्या नावाखाली नवीन बांधकामे आणि हेरिटेज वास्तूंचे नूतनीकरण सुरू असल्याचा गंभीर आरोप झाला आहे. माथेरान सनियंत्रण समितीला डावलून नगरपरिषदेने दिलेल्या दुरुस्ती परवानग्यांमधील अटींची पूर्तता दर्शविणारे मूळ अभिलेखच कार्यालयात उपलब्ध नसल्याचे माहिती अधिकारातून समोर आले आहे. या प्रकरणाची दखल घेत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत.

सामाजिक कार्यकर्ते दिगंबर रामचंद्र चंदने यांनी याबाबत तक्रार दाखल केली आहे. त्यांनी २८ जुलै २०२६ रोजी माहिती अधिकारांतर्गत डिसेंबर २०२३ पासून एमपी आणि बीपी भूखंडांवर दिलेल्या किरकोळ दुरुस्ती परवानग्यांची माहिती मागितली होती. हेरिटेज समितीची मंजुरी, स्ट्रक्चरल ऑडिट, स्थळपाहणी अहवाल, कामापूर्वी व कामानंतरची छायाचित्रे आणि काम पूर्णत्वाचे दाखले यांचीही मागणी केली होती.

नगरपरिषदेने १० ऑगस्ट रोजी दिलेल्या उत्तरात काही परवानग्यांच्या प्रती दिल्या; मात्र महत्त्वाची कागदपत्रे कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध नसल्याचे कळविल्याचा चंदने यांचा दावा आहे. परवानगीपत्रांमध्ये या कागदपत्रांच्या अटी नमूद असताना त्यांची पूर्तता झाल्याचे पुरावे कुठे आहेत, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

या तक्रारीनंतर जिल्हा सहआयुक्तांनी ३ नोव्हेंबर रोजी प्रकरण माथेरान नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे पाठविले. नियमोचित चौकशी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह पूर्तता अहवाल तातडीने सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

किरकोळ दुरुस्तीच्या नावाखाली प्रत्यक्षात कोणती कामे झाली? हेरिटेज समितीची मंजुरी घेतली होती का? स्ट्रक्चरल ऑडिट आणि स्थळपाहणी कोणी केली? या प्रश्नांची उत्तरे आता चौकशीतून समोर येणार आहेत.

चौकशीचा निकाल काय?

माथेरानचा ऐतिहासिक वारसा आणि पर्यावरण धोक्यात येऊ नये, यासाठी बांधकाम नियमांचे पालन आवश्यक आहे. आता चौकशीत अभिलेखांची उपलब्धता, परवानग्यांची वैधता आणि कथित अनियमितता स्पष्ट होणार का, याकडे माथेरानकरांचे लक्ष लागले आहे

पाच मालमत्तांवर संशयाची सुई

चंदने यांनी गार्डन रिसॉर्ट (भूखंड १३५), सेक्रेटरी ऑफ मर्चंट नेव्ही (१०४), केकी लॉज (१४७), एल्फिन्स्टन लॉज (४१) आणि कच्छ कॅसल (०५) या मालमत्तांच्या परवानग्यांवर आक्षेप घेतला आहे. आवश्यक मंजुरी आणि तपासणीचे मूळ अभिलेख उपलब्ध नसल्याचा त्यांचा दावा आहे.

> परवानगीपत्रांमध्ये हेरिटेज मंजुरी, स्ट्रक्चरल ऑडिट आणि छायाचित्रांच्या अटी आहेत; मात्र त्यांची पूर्तता दर्शविणारे अभिलेख मिळत नाहीत. या परवानग्यांची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी.
> – दिगंबर चंदने, तक्रारदार

टोरंटसाठी पोलीस लाचार?

- हक्काचा रस्ता मागणाऱ्या सावळे ग्रामस्थांवर गुन्हे
- ट्रॅक्टर अंगावर घातल्याची तक्रार बेदखल

| नेरळ | प्रतिनिधी |

पंतप्रधानांच्या दौऱ्यासाठी गावाचा रस्ता खोदला, दौरा रद्द झाल्यानंतर रस्ता दुरुस्त करण्याची जबाबदारी झटकली आणि न्याय मागण्यासाठी गेलेल्या ग्रामस्थांवरच पोलिसांनी गुन्हे दाखल केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. टोरंटपुढे पोलीस यंत्रणा लाचार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. कारण, कंपनीच्या कामाला प्रशासनाचे संरक्षण, मात्र स्थानिकांच्या हक्कांसाठी आवाज उठवणाऱ्या तरुणांच्या वाट्याला पोलिसी कारवाई, असा संतापजनक प्रकार सावळे गावात समोर आला आहे.

ट्रॅक्टर अंगावर घातल्याचा आरोप करणाऱ्या तरुणांची तक्रार ऐकून घेण्याऐवजी डंपरवरील दगडफेकीच्या प्रकरणात ग्रामस्थांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याने कर्जत पोलिसांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कंपनीच्या कामासाठी प्रशासन तत्पर आणि न्याय मागणाऱ्या जनतेसाठी मात्र कायद्याचा बडगा, असा हा कारभार आहे का, असा संतप्त सवाल ग्रामस्थांकडून उपस्थित होत आहे.

गावाचा रस्ता खोदून ठेवल्याने संतप्त झालेल्या सावळे ग्रामस्थांनी लाखाचीवाडी येथील टोरंट कंपनीच्या कामाच्या ठिकाणी धाव घेतली. रस्त्याची दुरुस्ती करा आणि सुरू असलेले खोदकाम व सपाटीकरण थांबवा, अशी मागणी त्यांनी केली. याचवेळी एका ट्रॅक्टरचा टायर गावातील दोन तरुणांच्या अंगावर घालण्यात आल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रसंगावधान राखत या तरुणांनी आपल्या दुचाकी बाजूला टाकून जीव वाचवला. मात्र, या घटनेनंतर पोलिसांनी घेतलेल्या भूमिकेवर ग्रामस्थांचा आक्षेप आहे. ट्रॅक्टर अंगावर घातल्याचा आरोप करणाऱ्या दोन्ही तरुणांचे म्हणणे ऐकून घेण्याऐवजी पोलिसांनी त्यांची तक्रार नोंदवून घेण्यास नकार दिल्याचा आरोप होत आहे. दुसरीकडे डंपरवरील दगडफेकीच्या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यामुळे पोलिसांची कारवाई एकतर्फी असल्याची भावना स्थानिकांमध्ये निर्माण झाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

पनवेलकरांना आठवड्यातून एक दिवस पाणीकपात

- आजपासून जलकुंभनिहाय नियोजन
- अल निनोचा पाणीपुरवठ्याला फटका

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

अल निनोच्या प्रभावामुळे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील पावसाळ्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने धरणांमधील उपलब्ध पाणीसाठा मर्यादित झाला आहे. त्यामुळे पाणीटंचाईची संभाव्य परिस्थिती लक्षात घेऊन पनवेल महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने जलकुंभनिहाय पाणीपुरवठ्याचे नियोजन केले आहे.

त्यानुसार सोमवार, दि. २३ नोव्हेंबर २०२६ पासून पनवेल शहरातील विविध उच्च जलकुंभांशी संबंधित भागांमध्ये आठवड्यातून एक दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. शासनाच्या दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या निर्णयानुसार तसेच धरणांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. शहरातील पाणीपुरवठ्याचे योग्य नियोजन करण्यासाठी प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या जलकुंभांमधून होणारा पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.

त्यानुसार सोमवारी मार्केट यार्ड उच्च जलकुंभ, भाजी मार्केट उच्च जलकुंभ आणि चोकाणी टाकी येथून होणारा पाणीपुरवठा बंद राहील. मंगळवारी पटेल मोहल्ला आणि पायोनियर उच्च जलकुंभांशी संबंधित भागांचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. बुधवारी एचओसी उच्च जलकुंभ, तर गुरुवारी ठाणा नाका उच्च जलकुंभाशी संबंधित साईनगर परिसरातील पाणीपुरवठा बंद राहील. तसेच शुक्रवारी गोल टाकी येथून होणारा पाणीपुरवठा बंद राहणार असून, मिडलक्लास हाऊसिंग सोसायटी भाग १ व २ आणि एस. के. बजाज परिसरातील पाणी पुरवठा बंद राहील.

शनिवारी गंगाराम सिनेमा उच्च जलकुंभाशी संबंधित टक्का गाव व कॉलनी परिसराचा पाणीपुरवठा बंद राहील. तर रविवारी शहरातील सर्व भागांमध्ये नियमित पाणीपुरवठा सुरू राहणार आहे. दरम्यान, उपलब्ध पाणीसाठ्यानुसार पाणी वितरणाच्या वेळेमध्ये आवश्यकतेनुसार बदल करण्यात येऊ शकतो, असे पनवेल महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने स्पष्ट केले आहे.

१३ वर्षीय मुलगी बेपत्ता

| तळा | प्रतिनिधी |

शाळेत जाते असे सांगून घराबाहेर पडलेली १३ वर्षे ९ महिन्यांची मुलगी बेपत्ता झाल्याची घटना तळा तालुक्यातील नानवली पोरा हटाड येथे घडली आहे. मुलीचे एका तरुणासोबत प्रेमसंबंध असल्याने त्यानेच तिला फूस लावून पळवून नेल्याचा संशय आईने व्यक्त केला आहे. याप्रकरणी तळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास ही मुलगी शाळेत जाते असे सांगून घरातून बाहेर पडली. मात्र, ती परत न आल्याने कुटुंबियांनी शेजारी आणि गावात शोध घेतला. तरीही तिचा ठावठिकाणा लागला नाही.

कृषीरत्न चंद्रशेखर भडसावळेंना मानद पदवी



- वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाकडून सन्मान
- एसआरटीसह शेतीतील विविध प्रयोगांची दखल

| नेरळ | प्रतिनिधी |

शेतीत नवनवीन प्रयोग करून शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची दिशा देणारे कर्जत तालुक्यातील मालेगावचे कृषीरत्न चंद्रशेखर भडसावळे यांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने मानद पदवी देऊन सन्मानित केले.

परभणी येथे झालेल्या विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात राज्यपाल तथा कुलपती डॉ. इंद्रमणी यांच्या हस्ते भडसावळे यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' (हॉनोरिस कॉसा) ही मानद पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी राहुरी आणि अकोला कृषी विद्यापीठांचे कुलगुरू, माजी कुलगुरू, पद्मश्री डॉ. ए.के. सिंग यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

भडसावळे यांनी भाताच्या विविध वाणांवर प्रयोग केले असून, शेतीसाठी उपयुक्त एसआरटी तंत्रज्ञान विकसित केले आहे. नांगरणी न करता कमी पाण्यात वर्षाला तीन पिके घेण्याची पद्धत त्यांनी विकसित केली. या तंत्रज्ञानाचा राज्यासह शेजारील राज्यांतील हजारो शेतकरी वापर करत आहेत. त्यांच्या कृषी क्षेत्रातील योगदानाची दखल घेत विद्यापीठाने हा सन्मान केला.

कामोठ्यात बांधकामाचा राडारोडा रस्त्यावर

- नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईची मागणी

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

कामोठे सेक्टर ६ मधील भूखंड क्रमांक २० येथे सुरू असलेल्या बांधकामामुळे परिसरातील नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. बांधकामासाठी वापरण्यात येणारी रेती, खडी, लोखंडी सळ्या आणि अन्य साहित्य थेट रस्त्यावर ठेवण्यात आल्याने पादचारी तसेच वाहनचालकांना अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या साहित्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या प्रकाराची पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'क' प्रशासनाने गांभीर्याने दखल घ्यावी. संबंधित बांधकामाची प्रत्यक्ष पाहणी करून बांधकाम परवानगी, मंजूर आराखडा आणि सुरक्षा उपाययोजनांची तपासणी करावी. सार्वजनिक रस्त्यावर बांधकाम साहित्य टाकून अतिक्रमण केले असल्यास ते तातडीने हटवावे, तसेच नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित विकासकावर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नगरसेविका मेघना घाडगे (भिसे) यांनी केली आहे.

बांधकामाच्या ठिकाणी नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक खबरदारी घेणे ही संबंधित विकासकाची जबाबदारी आहे. मात्र, रस्त्यावरच बांधकाम साहित्याचा पसारा असल्याने स्थानिक नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

नागरिकांच्या जीविताशी खेळण्याचा अधिकार कोणालाही नाही. बांधकाम व्यावसायिकांच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत असेल, तर ते खपवून घेतले जाणार नाही. प्रशासनाने तातडीने पाहणी करून कारवाई करावी. अन्यथा शिवसेनेच्या माध्यमातून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही घाडगे यांनी दिला आहे.

१३ वर्षीय मुलीचे अपहरण

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत बाजारपेठेतून १३ वर्षांच्या मुलीला फूस लावून पळवून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. २० नोव्हेंबर रोजी दुपारी घडलेल्या या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून, मुलीच्या कुटुंबियांनी पोलिसांत धाव घेतली आहे. याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पनवेल महापालिकेसमोर उभारणार संविधान स्तंभ

- सचिन गायकवाड यांच्या पाठपुराव्याला यश

| पनवेल | विशेष प्रतिनिधी |

पनवेल महानगरपालिकेच्या नवीन मुख्यालयासमोर, स्वराज्य इमारतीच्या परिसरात संविधान स्तंभ उभारण्यात येणार आहे. कामोठे येथील संविधानप्रेमी सचिन गायकवाड यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, गुरुवारी झालेल्या महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत या प्रस्तावाला एकमताने मंजुरी देण्यात आली.

संविधानातील न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविणे, तसेच नागरिकांना अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव करून देणे हा या स्तंभ उभारणीमागील उद्देश आहे. प्रभाग समिती 'ड' अंतर्गत प्रभाग क्रमांक १४ मधील नवीन मुख्यालयाच्या परिसरात हा स्तंभ उभारला जाणार आहे.

महाराष्ट्र शासनाने २२ मार्च २०२१ रोजी राज्यातील प्रत्येक तालुक्यात संविधान स्तंभ उभारण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर सचिन गायकवाड यांनी शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींकडे सातत्याने पाठपुरावा केला. वास्तुविशारदांनी सुचविलेल्या चार संभाव्य जागांपैकी योग्य जागा निश्चित करून पुढील कामाचे नियोजन केले जाणार आहे. महापौर नितीन पाटील, आयुक्त मंगेश चितळे आणि सभागृह नेते प्रकाश बिनेदार यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे प्रस्तावाला मंजुरी मिळाली.

पान १ वरुन

कर्जतकरांचा एल्गार

मोठी गर्दी केली होती. टोरंट प्रकल्प परिसरासह प्रस्तावित पोशीर, शिलार आणि टाटा धरण परिसरातील नागरिकांनीही मोहिमेत सहभाग घेतला. टोरंट प्रकल्पासाठी पाली-सायडोंगर परिसरात हजारो झाडांची तोड करण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. केवळ एका प्रकल्पापुरता हा लढा मर्यादित नसून, कर्जत तालुक्यातील पर्यावरण उद्ध्वस्त करणारे सर्व प्रकल्प रद्द करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

या मोहिमेत कर्जत पर्यावरण बचाव समितीचे समन्वयक ॲड. कैलास मोरे, शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, तालुकाप्रमुख बाजीराव दळवी, माजी नगराध्यक्ष राजेश लाड, उपनगराध्यक्ष संतोष पाटील, मनसेचे जितेंद्र पाटील, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संजय गवळी यांच्यासह धर्मेंद्र मोरे, प्रशांत उगले, रंजन दातार, प्रवीण गांगल, सतीश मुसळे, विद्या वनगे, स्वीटी बार्शी, विजय बेडेकर, महेंद्र भोईर, लोकेश यादव, प्रशांत सदावर्ते, अतुल पवार, मुकेश शाह, विजय मांडे, अविनाश भोईर आणि रामचंद्र खरमरे आदी उपस्थित होते.

कर्जत तालुक्यात येणारे सर्व पर्यावरणविघातक प्रकल्प रद्द झाले पाहिजेत. येथील निसर्ग आणि पर्यावरण वाचवण्यासाठी आम्ही शेवटपर्यंत लढा देणार आहोत. असे प्रमिला बोराडे यांचे म्हणणे आहे.

रविवार ठरला घातवार!

दिल्लीहून वाराणसीकडे जाणाऱ्या या बसमधील दोन प्रवाशांचा मृत्यू झाला, तर १५ जण जखमी झाले. त्यापैकी सात जणांची प्रकृती गंभीर आहे.

राजस्थानमधील कोटा-उदयपूर राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील नऊ जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये लहान मुलांचाही समावेश असून, सहा जण जखमी झाले आहेत. बिहारमधील अथमलगोला येथे तिलक समारंभातून परतणाऱ्या स्कॉर्पिओला भरधाव वाहनाने धडक दिली. या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू, तर तीन जण गंभीर जखमी झाले.

हरियाणातील करनाल येथे दोन वाहनांची धडक होऊन दोघांचा जीव गेला. गुजरातमधील कच्छ येथे भुज-खावडा महामार्गावर कार आणि भरधाव ट्रकची भीषण धडक झाली. या अपघातात एकाच कुटुंबातील सात जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये तीन मुले आणि अवघ्या तीन महिन्यांच्या बाळाचाही समावेश आहे. हे कुटुंब रण ऑफ कच्छला भेट देऊन भुजकडे परतत होते. राजस्थानमधील जोधपूर येथे कार आणि प्रवासी वाहनाची धडक होऊन तीन जणांचा मृत्यू झाला, तर १५ जण जखमी झाले. गुजरातमधील एक कुटुंब रामदेवरा दर्शनासाठी जात असताना हा अपघात घडला.

वेगाचा कहर, निष्काळजीपणाचा बळी!

या अपघातांमागे अतिवेग, चालकांचा थकवा आणि झोप, वाहतूक नियमांचे उल्लंघन तसेच रस्त्यांच्या दुरवस्थेसारखी कारणे समोर येत आहेत. रस्त्याच्या कडेला उभी असलेली अवजड वाहने, खड्डे, अपूर्ण बांधकाम, अपुरे दिशादर्शक आणि प्रकाशव्यवस्थेचा अभाव यामुळेही अपघातांचा धोका वाढत आहे.

रक्तदानातून माणुसकीचा जागर!

न राहता रक्तदानासारख्या जीवनदायी उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. या आवाहनाला नागरिकांनीही सकारात्मक प्रतिसाद देत रक्तदानासाठी पुढाकार घेतला.

या शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे मित्रमंडळाच्या कार्यकर्त्यांसोबतच विविध क्षेत्रांतील नागरिकांनीही रक्तदानात सहभाग नोंदवला. त्यामुळे वाढदिवसाचा हा सोहळा एका व्यक्तीपुरता किंवा मित्रपरिवारापुरता मर्यादित न राहता सामूहिक सामाजिक सहभागाचे व्यासपीठ ठरला. रक्ताची गरज असलेल्या रुग्णांसाठी रक्तपेढीतील प्रत्येक रक्तपिशवी महत्त्वाची असते. याच सामाजिक जाणिवेतून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराने रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित केले. याप्रसंगी उपनगराध्यक्षा ॲड. मानसी मात्रे, नगरसेविका अश्विनी ठोसर, माजी नगरसेविका वृषाली ठोसर, साक्षी पाटील, नीलम हजारे, ऋषिकेश माळी, संतोष गुरव, योजना पाटील, निवेदिता वाघमारे, शैला भगत, वृषाली भगत, सुषमा पाटील, संध्या पालवणकर, सागर भगत, अनिल चोपडा, समीर ठाकूर यांच्यासह नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबीर यशस्वी करण्यासाठी रवी थोरात, संजय कांबळे, कपिल अनुभवणे, मुसद्दीक चौधरी, प्रकाश राठोड, सागर पेरेकर, राकेश म्हात्रे, डॉ. दीपक गोसावी यांच्यासह टीमने परिश्रम घेतले. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या सहकार्याने आणि मित्रमंडळाच्या कार्यकर्त्यांच्या योग्य समन्वयातून हे शिबीर यशस्वीरित्या पार पडले.

वाढदिवस हा प्रत्येकाच्या आयुष्यातील आनंदाचा दिवस असतो. मात्र, या आनंदात समाजालाही सहभागी करून घेतल्यास त्यातून निर्माण होणारे ऋणानुबंध अधिक अर्थपूर्ण ठरतात. शुभेच्छांच्या माध्यमातून मिळणारे प्रेम रक्तदानासारख्या समाजोपयोगी उपक्रमातून समाजाला परत देण्याचा संदेश प्रशांत नाईक मित्र मंडळाने या उपक्रमातून दिला.

जंगलावर घाव घालाल, तर संघर्ष अटळ!

जंगल हक्क कायद्याने आदिवासींना दिलेल्या अधिकारांचे संरक्षण करणे महत्त्वाचे असताना टोरंट कंपनीच्या प्रकल्पासाठी स्थानिकांवर सक्ती का केली जात आहे, असा सवाल उल्का महाजन यांनी उपस्थित केला.

सरकार एका बाजूला जंगल वाचवण्याच्या घोषणा करते आणि दुसऱ्या बाजूला विकासाच्या नावाखाली त्याच जंगलावर घाव घालण्याची तयारी सुरू आहे, असा आरोप महाजन यांनी केला. केवळ झाडे लावून जंगल निर्माण होत नाही. जंगलाचे संरक्षण, संवर्धन आणि त्यावर अवलंबून असलेल्या स्थानिकांच्या हक्कांचा आदर करणे आवश्यक आहे, असे त्यांनी ठणकावून सांगितले. रोजगार मिळेल, विकास होईल, अशा आश्वासनांमागे नेमके काय दडले आहे? आता स्थानिक जनता रोजगाराच्या भूलथापांना बळी पडणार नाही. आदिवासींचे जंगल आणि जमिनीवरील अधिकार डावलून प्रकल्प पुढे रेटण्याचा प्रयत्न का केला जात आहे? जंगल, जमीन आणि जगण्याचा अधिकार धोक्यात घालून कोणाचा विकास साधला जाणार? असे सवालही त्यांनी उपस्थित केले.

टोरंट कंपनी आणि सरकारकडून रोजगाराची आश्वासने देऊन जनतेला भुलवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत जंगल वाचवण्याचा लढा आता अधिक तीव्र होणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला. या ग्रामसभेला पाली संघर्ष समितीचे पदाधिकारी, स्थानिक ग्रामस्थ आणि आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धोकादायक विहिरीकडे दुर्लक्ष

रस्त्यालगतच्या पाण्याने भरलेल्या उघड्या विहिरीत कोसळून तीन प्रौढ आणि सहा लहान मुलांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. या घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील महामार्गालगतच्या उघड्या विहिरींचे सुरक्षा ऑडिट करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अनेक ठिकाणी संरक्षक जाळ्या बसविण्यात आल्या आहेत.

मात्र, महाड-मंडणगड खाडीपट्टा मार्गावरील तेलंगे मोहल्ल्यातील विहीर अद्याप उघडीच आहे. रस्त्यापासून अवघ्या अर्ध्या फुटावर असलेली ही विहीर वाहनचालकांसाठी मोठा धोका बनली आहे. त्यातच रात्रीच्या वेळी परिसरात अंधार असल्याने वाहनचालकांचा अंदाज चुकल्यास गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता आहे.

या विहिरीवर संरक्षक जाळी बसविण्यासाठी महामार्ग वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी महाड येथील राष्ट्रीय महामार्ग उपविभागाला चार ते पाच वेळा लेखी पत्रे दिली आहेत. मात्र, वारंवार सूचना देऊनही संबंधित विभागाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही. शाखा अभियंता अभिजीत झेंडे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळू शकला नाही.

या मार्गावरून रात्रंदिवस मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. त्यामुळे संभाव्य जीवितहानी टाळण्यासाठी महामार्ग विभागाने तातडीने विहिरीवर संरक्षक जाळी बसवावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे. चार-पाच पत्रांनंतरही प्रशासनाची झोप उडत नसेल, तर आता एखाद्या बळीचीच प्रतीक्षा आहे का? असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

छळाला कंटाळून तरुणीची आत्महत्या

या त्रासाला कंटाळून मोहिनीने १७ नोव्हेंबर रोजी निडी गावाच्या हद्दीत नागोठणे-वडखळ प्रवासादरम्यान रिक्षात तणनाशक प्राशन केले. तिला पेण येथील सरकारी रुग्णालयातून अलिबाग जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला.

मृत तरुणीचे वडील मधुसूदन शंकर पाटील यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून, नागोठणे पोलीस ठाण्याचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र पारखे तपास करीत आहेत.

रायगड थंडीने गारठला

स्वेटर, जॅकेट आणि उबदार कपड्यांचा वापर सुरू झाला आहे.

भारतीय हवामान विभागाच्या अलिबाग केंद्राच्या २२ नोव्हेंबरच्या अंदाजानुसार, किमान तापमान २३ अंश सेल्सिअस, तर कमाल तापमान ३३ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे. पुढील काही दिवस आकाश मुख्यतः निरभ्र राहण्याचा अंदाज आहे. त्यामुळे सकाळ-संध्याकाळ गारवा आणि दिवसा उष्णता असे वातावरण कायम राहण्याची शक्यता आहे. थंडीची चाहूल लागल्याने नागरिकांनी बदलत्या हवामानानुसार काळजी घेण्याची गरज आहे. विशेषतः लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनी पहाटेच्या थंडीत बाहेर पडताना उबदार कपड्यांचा वापर करावा.

उद्योजक श्रीनिवास बेंडखळेंचा अपघाती मृत्यू

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगाव तालुक्यातील गोरेगाव येथील उद्योजक श्रीनिवास बेंडखळे यांचा ताम्हिणी घाटात झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. गेल्या दोन दिवसांपासून ते बेपत्ता होते. त्यांच्या वाहनाचे ठिकाण ताम्हिणी घाट परिसरात आढळल्यानंतर शोधमोहीम राबविण्यात आली. यावेळी घाटातील सुमारे १२०० फूट खोल दरीत त्यांचे वाहन आढळून आले. या अपघातात त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले.

श्रीनिवास बेंडखळे हे दोन दिवसांपासून बेपत्ता असल्याने कुटुंबीय आणि नातेवाईकांकडून त्यांचा शोध सुरू होता. दरम्यान, त्यांच्या वाहनाचे ठिकाण ताम्हिणी घाटात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर शोध आणि बचाव पथकांना पाचारण करण्यात आले. ताम्हिणी घाटातील खोल दरी आणि दुर्गम परिसरामुळे शोधमोहीम आव्हानात्मक ठरली. स्वयंसेवी बचाव पथक आणि शेलारमामा यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेत शोधमोहीम सुरू केली. अथक प्रयत्नांनंतर रात्री उशिरा सुमारे १२०० फूट खोल दरीतून श्रीनिवास बेंडखळे यांचा मृतदेह बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले. त्यानंतर मृतदेह पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी पौड पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला.

या दुर्घटनेमुळे गोरेगाव परिसरात हळहळ व्यक्त होत असून, बेंडखळे यांच्या निधनाने कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या अपघाताबाबत पौड पोलीस पुढील तपास करीत आहेत.

पोलादपूरमध्ये २८ नोव्हेंबरला मोफत आरोग्य तपासणी शिबीर

| पोलादपूर | प्रतिनिधी |

पोलादपूर शहरातील आपला दवाखाना येथे शनिवार, २८ नोव्हेंबर रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटेबल ट्रस्ट संचालित भ.क.ल. वालावलकर रुग्णालय, डेरवण आणि आपला दवाखाना यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबीर होणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते उदय खरे यांनी दिली.

या शिबिरात स्त्रीरोग, जनरल मेडिसिन, अस्थिरोग, जनरल सर्जरी, नेत्ररोग तसेच कान-नाक-घसा तज्ज्ञ रुग्णांची तपासणी करणार आहेत. योजनेअंतर्गत ॲंजिओप्लास्टी, कर्करोग शस्त्रक्रिया, बायपास सर्जरी, मुतखडा, पित्ताशयातील खडे आदी शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार आहेत. तसेच हर्निया, गर्भाशयाचे आजार यांसह विविध शस्त्रक्रिया अल्पखर्चात केल्या जाणार आहेत. शिबिराचा लाभ घेण्यासाठी अमित वैद्य ९३७२३३७२५३, उदय खरे ९४२३३७६४६७, डॉ. गुलाबराव सोनवणे ९२७२५८८८२८ आणि सनी दुदुस्कर ७५५८८१००५ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अलिबागच्या विकासाचे शिल्पकार प्रशांत नाईक

सामाजिक बांधिलकी, विकासाभिमुख नेतृत्व आणि सांस्कृतिक परंपरांना बळ देत अलिबागच्या नावलौकिकात भर घालणारे लोकनेते; अलिबागकरांच्या सुख-दुःखात सदैव सहभागी असणारे विश्वासाचे नेतृत्व अर्थात प्रशांत नाईक! अलिबाग आणि प्रशांत नाईक हे समीकरण आता केवळ राजकीय राहिलेले नाही, तर ते विश्वासाचे, आपुलकीचे आणि जिव्हाळ्याचे बनले आहे. अलिबागच्या विकासाचा विचार असो, सामाजिक बांधिलकी जपण्याची भूमिका असो किंवा शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्याचा प्रयत्न असो, प्रत्येक क्षेत्रात प्रशांत नाईक यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. म्हणूनच अलिबागकरांच्या मनात त्यांच्या नेतृत्वाला विशेष स्थान आहे.



रोशन पाटील

मितभाषी स्वभाव, मनमिळाऊ व्यक्तिमत्त्व आणि प्रसंगी अन्यायाविरोधात ठामपणे उभे राहण्याची लढाऊ वृत्ती ही प्रशांत नाईक यांच्या नेतृत्वाची वैशिष्ट्ये आहेत. राजकारण करताना केवळ पद आणि प्रतिष्ठेला महत्त्व न देता सामान्य माणसाशी नाळ जोडून ठेवण्याचे काम त्यांनी केले. अलिबागकरांच्या अडीअडचणीच्या काळात धावून जाणे, त्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देणे आणि शहराच्या हितासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणे, यामुळेच त्यांनी नागरिकांचा विश्वास संपादन केला आहे.

या नेतृत्वाचा खरा प्रत्यय कोरोना महामारीच्या काळात आला. लॉकडाऊनमुळे सर्वत्र भीतीचे वातावरण असताना प्रशांत नाईक यांनी आपल्या मित्रमंडळाच्या माध्यमातून गरजू नागरिकांना मदतीचा हात दिला. स्वतःला कोरोनाची लागण झालेली असतानाही त्यावर मात करून त्यांनी रुग्णालयातील रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून आवश्यक उपकरणांची व्यवस्था केली. रुग्णांना जेवणाचे डबे पोहोचविण्यापासून ते गरजूंना प्रत्यक्ष जेवण भरविण्यापर्यंत त्यांच्या सहकाऱ्यांनी माणुसकीचे दर्शन घडविले. संकटाच्या काळात माणसांच्या मदतीला धावून जाणारे नेतृत्व म्हणून प्रशांत नाईक यांची प्रतिमा अधिक ठळक झाली.



शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी प्रशांत नाईक यांच्यातील नेतृत्वगुण ओळखून अलिबाग नगरपरिषदेची जबाबदारी त्यांच्यावर सोपविली. त्यांनीही ही जबाबदारी समर्थपणे पेलत अलिबागच्या विकासाला नवी दिशा दिली. शहरातील पायाभूत सुविधा, समुद्रकिनाऱ्याचे सुशोभीकरण, पर्यटनाभिमुख विकास, नागरी सुविधांचा विस्तार अशा विविध कामांतून त्यांनी अलिबागचा चेहरामोहरा बदलण्याचा प्रयत्न केला. सर्वांना सोबत घेऊन शहराच्या विकासाला प्राधान्य देण्याची त्यांची कार्यपद्धती नागरिकांच्या पसंतीस उतरली. त्यांच्या नेतृत्वाखाली अलिबाग नगरपरिषदेने राज्यातही एक आदर्श निर्माण केला.

प्रशांत नाईक यांचे कार्य केवळ नगरपरिषदेच्या विकासकामांपुरते मर्यादित राहिलेले नाही. अलिबागची सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी आणि शहरातील नागरिकांना एकत्र आणण्यासाठी त्यांनी सातत्याने पुढाकार घेतला आहे. दहीहंडी उत्सवाच्या माध्यमातून तरुणाईला प्रोत्साहन देणे, अलिबाग फेस्टिव्हलच्या माध्यमातून कला, संस्कृती आणि मनोरंजनाला व्यासपीठ उपलब्ध करून देणे, विविध सामाजिक आणि सार्वजनिक उपक्रम राबविणे, अशा अनेक माध्यमांतून त्यांनी अलिबागच्या सार्वजनिक जीवनात चैतन्य निर्माण केले. उत्सव हे केवळ मनोरंजनाचे साधन न राहता त्यातून सामाजिक एकोपा, बंधुभाव आणि शहराची ओळख अधिक बळकट व्हावी, यासाठी त्यांचे प्रयत्न राहिले आहेत.

क्रीडा क्षेत्रालाही त्यांनी तितकेच महत्त्व दिले. अलिबागमध्ये स्व. नमिता नाईक स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सची उभारणी हे त्याचे उदाहरण आहे. नव्या पिढीला क्रीडा सुविधा मिळाव्यात, तरुणांमधील क्रीडागुणांना वाव मिळावा, हा त्यामागील विचार होता. पर्यटन, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम, सामाजिक कार्य आणि नागरी विकास अशा सर्वच क्षेत्रांत त्यांनी दिलेले योगदान अलिबागच्या प्रगतीला हातभार लावणारे ठरले आहे.

प्रशांत नाईक यांच्या कुटुंबाची अलिबागच्या नगराध्यक्षपदाच्या कारभारातही मोठी परंपरा राहिली आहे. त्यांच्या मातोश्री सुनीताकाकू आणि पत्नी स्व. नमिता नाईक यांनीही आपल्या कार्यकाळात ठसा उमटविला. विशेषतः स्व. नमिता नाईक यांनी अलिबागची अस्मिता जपणाऱ्या लढाऊ नेतृत्वाची ओळख निर्माण केली. मात्र, प्रशांत नाईक यांनी स्वतःच्या कार्यशैलीतून आणि लोकांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या संबंधांतून स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आज त्यांची कन्या अक्षया नाईक नगराध्यक्षपदाची जबाबदारी सांभाळत असताना प्रशांत नाईक यांचे मार्गदर्शन त्यांच्यासाठी महत्त्वाचे ठरत आहे.

अलिबागकरांचा विश्वास हीच प्रशांत नाईक यांच्या नेतृत्वाची खरी ताकद आहे. हा विश्वास केवळ आश्वासनांमधून नव्हे, तर प्रत्यक्ष कामातून त्यांनी मिळविला आहे. शहराच्या विकासासाठी घेतलेले निर्णय, नागरिकांच्या प्रश्नांसाठी दाखविलेली तत्परता आणि प्रत्येक सामाजिक-सांस्कृतिक उपक्रमात असलेला सक्रिय सहभाग यामुळे त्यांचे अलिबागशी असलेले नाते अधिक घट्ट झाले आहे. एखाद्या शहराची ओळख केवळ त्याच्या समुद्रकिनाऱ्याने, पर्यटनस्थळांनी किंवा ऐतिहासिक वारशाने होत नसते; तर त्या शहरासाठी मनापासून काम करणाऱ्या माणसांमुळेही ती घडत असते. प्रशांत नाईक यांनी आपल्या कार्यातून अलिबागच्या या ओळखीत मोलाची भर घातली आहे. पद असो वा नसो, अलिबागच्या विकासाचा ध्यास आणि अलिबागकरांशी असलेली आपुलकी कायम जपणारे हे नेतृत्व असेच कार्यरत राहो, त्यांच्या हातून समाजहिताची आणि शहराच्या प्रगतीची अनेक नवी कामे घडोत, हीच वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक सदिच्छा!

विकासकामांचा बोजवारा

- **पाण्यासाठी आपटा ग्रामस्थांची वणवण**
- **जलजीवन योजना, ग्रामपंचायत इमारत अपूर्ण**

| आपटा | प्रतिनिधी |

एकीकडे पाण्यासाठी ग्रामस्थांची वणवण, तर दुसरीकडे कोट्यवधींची जलजीवन योजना रखडलेली आणि ग्रामपंचायतीची इमारतही अपूर्णावस्थेत आहे. आपटा गावातील विकासकामांचा अक्षरशः बोजवारा उडाला असून, प्रशासनाच्या कारभारावर ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. गावाचा विकास कागदावरच राहणार का, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

आपटा गावात सध्या अवघा ३५ मिनिटे पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. पूर्वी दररोज एक तास पाणी मिळत होते. त्यानंतर हा कालावधी ४५ मिनिटांवर आला आणि आता केवळ ३५ मिनिटे पाणीपुरवठा होत आहे. हेटवणे पाणीपुरवठा योजनेचा पुरवठा दररोज पाच तास बंद ठेवला जात असल्याने गावाला मिळणाऱ्या पाण्याचे प्रमाण कमी होत असल्याची माहिती पुढे आली आहे. त्यातच पाणीपट्टीची मोठ्या प्रमाणात थकबाकी असून, नागरिकांकडून बिले भरली जात नसल्याचीही समस्या आहे. गावाचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मोठ्या क्षमतेची नवीन पाइपलाइन टाकण्याची मागणी होत आहे.





दीड कोटींची जलजीवन योजना रखडली

केंद्र सरकारच्या जलजीवन मिशनअंतर्गत २०२२-२३ मध्ये आपटा गावासाठी सुमारे १ कोटी ५२ लाख १९ हजार ७८६ रुपयांची पाणीपुरवठा योजना मंजूर झाली होती. कामाची ऑर्डर आणि करारनामा क्रमांक २३१/२०२२-२३ नुसार कामालाही सुरुवात झाली. गावात नळजोडणीची कामे करण्यात आली; मात्र अद्याप साठवण टाकीचे काम पूर्ण झालेले नाही. मुख्य ठेकेदार आणि पोटठेकेदार यांच्या माध्यमातून काम सुरू असताना आता निधी उपलब्ध नसल्याचे कारण देत काम बंद ठेवण्यात आले आहे. कोट्यवधींची योजना असूनही ग्रामस्थांना पुरेसे पाणी मिळत नसल्याने योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

ग्रामपंचायत इमारतही धूळखात

गावातील ग्रामपंचायतीच्या नवीन इमारतीचे काम गेल्या चार ते पाच वर्षांपासून अर्धवट अवस्थेत पडून आहे. इमारतीसाठी निवडलेली जागा पूररेषेत असल्याचा आक्षेप असून, आराखडाही चुकीच्या पद्धतीने तयार केल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. याबाबत ग्रामसभेत विषय मांडूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे सार्वजनिक निधी खर्च होऊनही ग्रामपंचायतीची इमारत अपूर्णच राहिली आहे.

बीडीओंनी लक्ष घालण्याची मागणी

गावातील विकासकामांची अवस्था पाहता ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे. सोळाव्या वित्त आयोगाच्या निधीतून होणाऱ्या कामांनाही अद्याप सुरुवात झालेली नसल्याची तक्रार आहे. ग्रामविकास अधिकारी आणि प्रशासकीय यंत्रणेने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी (बीडीओ) आपटा गावातील सर्व विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करून कामांचा दर्जा आणि विलंबाची कारणे तपासावीत, अशी मागणी ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

दलालांना कार्यालयाच्या प्रवेशद्वारावरच लगाम

अधिकाऱ्यांचा थेट नागरिकांशी संवाद

| पनवेल | प्रतिनिधी |

आरटीओ कार्यालयातील कामांसाठी दलालांवर अवलंबून राहावे लागत असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयाने कडक पावले उचलली आहेत. नागरिकांची दिशाभूल आणि आर्थिक पिळवणूक रोखण्यासाठी प्रादेशिक अधिकारी जयंत चव्हाण यांनी स्वतः कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर बसून नागरिकांशी थेट संवाद साधण्यास सुरुवात केली आहे. ओळखपत्र आणि कामासंबंधीची कागदपत्रे तपासल्यानंतरच कार्यालयात प्रवेश दिला जात असल्याने दलालांच्या मनमानीला आळा घालण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आरटीओ कार्यालयांच्या कामकाजात पारदर्शकता राखण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार परिवहन आयुक्तांनीही सर्व कार्यालयप्रमुखांना पारदर्शक कारभार करण्याचे निर्देश दिले आहेत. या पार्श्वभूमीवर पनवेल आरटीओने प्रवेशद्वारावरच मदत व मार्गदर्शन व्यवस्था सुरू केली आहे. प्रादेशिक अधिकारी जयंत चव्हाण हे सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत प्रवेशद्वारावर उपस्थित राहून नागरिकांच्या कामाची माहिती घेतात. त्यानंतर आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन करून संबंधित विभागात पाठवले जाते. यासाठी स्वतंत्र नोंदवहीही ठेवण्यात आली आहे. याठिकाणी येणाऱ्यांना आता थेट अधिकाऱ्यांशी संवाद साधता येत असल्याने कामकाजात सुलभता येण्यास मदत होत आहे.

दरम्यान, वाहनधारकांची गैरसोय टाळण्यासाठी परिवहन विभागाने अनेक सेवा ऑनलाइन उपलब्ध केल्या आहेत. 'वाहन' प्रणालीद्वारे वाहनांशी संबंधित ८८ पैकी ४२ सेवा, तर 'सारथी' प्रणालीद्वारे वाहनचालक परवान्यांच्या २७ पैकी २३ सेवा ऑनलाइन मिळतात. त्यामुळे मध्यस्थांच्या आमिषाला बळी न पडता अधिकृत ऑनलाइन सेवांचा वापर करा, असे आवाहन जयंत चव्हाण यांनी केले आहे.

बनावट विदेशी मद्याचा साठा जप्त

| पनवेल | प्रतिनिधी |


बनावट व भेसळयुक्त विदेशी मद्याचा साठा तसेच विनापरवाना देशी दारूची विक्री होत असल्याप्रकरणी उत्पादन शुल्क विभागाच्या पनवेल पथकाने गव्हाण फाटा येथील ओम साई धाब्यावर छापा टाकून एकाला अटक केली आहे. या कारवाईत मद्यासह स्कुटी आणि दोन मोबाईल असा एकूण २ लाख ४१ हजार १७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पनवेल-उरण महामार्गावरील गव्हाण फाटा येथील ओम साई धाब्यावर उत्पादन शुल्क विभागाने छापा टाकला. धाब्याच्या परिसराची तपासणी केली असता तेथे बनावट व भेसळयुक्त विदेशी मद्याचा तसेच विनापरवाना देशी दारूचा साठा आढळून आला. या मद्यसाठ्याची किंमत १ लाख २६ हजार १७० रुपये असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय दारूबंदी गुन्ह्यात वापरलेली स्कुटी आणि दोन मोबाईलही जप्त करण्यात आले.

अपहरणाच्या संशयाने खळबळ

| पनवेल | प्रतिनिधी |

पनवेल शहरातून ११ वर्षीय आफान मुकीन शेख हा मुलगा बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. अज्ञात व्यक्तीने फूस लावून त्याला नेल्याच्या तक्रारीवरून पनवेल शहर पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, एका व्यक्तीने आफानचा हात धरून त्याला सोबत नेत असल्याचे छायाचित्र समाजमाध्यमांवर प्रसारित होत असून, त्याच्या सत्यतेबाबत पोलिसांकडून पडताळणी होणे आवश्यक आहे. व्हायरल छायाचित्रातील व्यक्तीची ओळख पटविण्यासह परिसरातील सीसीटीव्ही चित्रण तपासून आफानचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. आफान मुकीन शेखचा मध्यम बांधा असून सावळा रंग, गोल चेहरा, सरळ नाक, काळे बारीक केस आणि काळे डोळे आहेत.





तीन किनाऱ्यांचा गौरव

रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन, दापोलीजवळील लाडघर आणि गुहागर या तीन किनाऱ्यांना आंतरराष्ट्रीय ब्लू फ्लॅग मानांकन मिळाले आहे. या सन्मानाबद्दल या तीनही शहरवासियांचे अभिनंदन करायला हवे. टेनिसमध्ये खेळाडूंना मानांकन दिले जाते त्या धर्तीवरचा हा गौरव आहे. असे मानांकन देताना त्या खेळाडूची केवळ विजेतेपदे लक्षात घेतली जात नाहीत. तर त्याचा त्या काळातला एकूण खेळ व कामगिरी पाहिली जाते. त्याच धर्तीवर किनारपट्टीवरील स्वच्छता हा एकच निकष इथे लावला जात नाही. तर किनारपट्टीवर पर्यावरणाचे रक्षण कशा प्रकारे केले गेले आहे, समुद्राचे पाणी किती प्रदूषणमुक्त आहे, पर्यटकांच्या सुरक्षिततेची कशी काळजी घेतली जाते आणि रस्ते, पाणी, प्रकाश वगैरे पायाभूत सोई तिथे कशा आहेत याचीही तपासणी होते. डेन्मार्कच्या फाऊंडेशन फॉर एन्व्हार्यमेंटल एज्युकेशन या संस्थेने १९८७ पासून ही मानांकनाची संकल्पना सुरु केली. विशेष म्हणजे एकदा मानांकन दिले की ते कायमचे असे यात होत नाही. संस्थेने एकूण ३३ निकष तयार केले असून प्रत्येक पर्यटक हंगामात हे ३३ निकष पाळले जातात की नाही याची पाहणी व तपासणी केली जाते. त्यानुसार हे मानांकन कायम ठेवायचे की कमी करायचे हे ठरवले जाते. महाराष्ट्रासाठी विशेष गौरवाची बाब म्हणजे कर्नाटक वगळता देशातील अन्य कोणत्याही राज्यात तीन किनाऱ्यांना असे मानांकन मिळालेले नाही. यंदा २२ किनाऱ्यांना हे मानांकन मिळाले. गेल्या वर्षी १८ किनाऱ्यांना ते मिळाले होते. त्यात नागावचाही समावेश होता. कोकणातले किनारे पूर्वापार स्वच्छ होते. कोकणात प्लास्टिकचा वापरही नगण्य असे. गावांमध्ये आजही स्वच्छता चांगली असते व कचरा किंवा सांडपाणी दिसत नाही. पण गावांची पर्यटनस्थळे झाली की ही स्थिती बदलते. गर्दी वाढते. पैसे कमावण्याच्या हव्यासापायी पुरेशा सोई नसतानाही हॉटेल्स, होमस्टे वगैरे उघडले जातात. मग गटारे वाहू लागतात. कचरा साठू लागतो. वस्ती वाढते आणि बाहेरून कामाला आलेल्या उपऱ्यांची संख्या वाढते. त्यातून आपला गाव, आपला समुद्र ही भावना नष्ट होते आणि बेपर्वाई वाढते.

शिस्त गरजेची

रायगड आणि रत्नागिरीचे बहुतेक समुद्रकिनारे आता हॉटेल्सनी भरून गेलेले आहेत. अनेकांनी जवळपास सेकंड होम्स घेतलेली आहेत. शनिवार रविवार जोडून सुट्टी आली की, मुंबई आणि पुण्यातील पैसेवाली मंडळी गाड्या किंवा बसेस घेऊन पर्यटन करायला इथे येतात. त्यांचा मूड फुल मजा करण्याचा असतो. एकूणच भारतीय लोकांचा स्वच्छतेचा सेन्स हा विचित्र आहे. अनेक जण आपली घरे अत्यंत स्वच्छ ठेवतात. पण सार्वजनिक जागी कचरा फेकायला, थुंकायला किंवा घाण करायला त्यांना काहीही वाटत नाही. ते येऊन कोणीतरी साफ करील अशी त्यांची मनोभूमिका असते. हेच लोक परदेशात गेले की तिथल्या स्वच्छतेचे गोडवे गातात. तिथे कचरा रस्त्यावर टाकला तर सज्जड दंड होतो. त्या भीतीने हे लोक तिथे सगळे नियम पाळतात. पण भारतात आल्यावर मात्र कसेही बेबंद वागतात. याचेच प्रतिबिंब कोकणातल्या किनाऱ्यांवर पडलेले दिसते. यामुळे पूर्वी शुभ्र वाळू आणि मोकळे असणारे किनारे आता खराब झाले आहेत. तिथे आता भेळपुरी, पाणीपुरी आणि चायनीजच्या गाड्या लागतात. त्यांचे सगळे सांडपाणी व कचरा किनाऱ्यावर पसरतो किंवा फेकला जातो. सक्त मनाई असूनही मोटारसायकली किंवा जीप्स वा मोठ्या गाड्या वाळूच्या पुळणीवर नेल्या जातात. त्यामुळे ती खराब होते. अनेक ठिकाणी ती घट्ट जमिनीसारखी कडक होऊन जाते. तिथली झुडपे नष्ट होतात. अनेक किनाऱ्यांवर साहसी खेळ अवतरले आहेत. पाण्यात चालवल्या जाणाऱ्या स्कूटर्स किंवा यांत्रिक बोटी यामुळे डिझेलचा धूर सर्वत्र पसरत असतो. त्या बॅटरीवर असल्या तरी त्यांचा त्रास होतोच. या सर्वच ठिकाणी पुरेशी सुरक्षा असतेच असे नाही. मग कधीतरी अपघात होतात. आपल्याकडचे मुरुड किंवा गणपतीपुळे हे किनारे तर अतिसाहसी लोकांच्या बुडून मरण्यामुळे कुविख्यात झालेले आहेत. वास्तविक थोडी काळजी घेतली व काही उपाय केले तर हेच पर्यटन आनंददायी आणि सुंदर होऊ शकते. पण त्यासाठी सरकार, पर्यटक आणि व्यावसायिक यांना किमान काही शिस्त व व्यावसायिकता बाणवणे आवश्यक आहे.

आपोआप टिकणार नाही

आपल्या तीन किनाऱ्यांचा सन्मान झाला ही चांगली बाब आहे. पण हे मानांकन आपण टिकवले पाहिजे. शिवाय अधिकाधिक किनारे स्वच्छ राहायला हवेत. कोकणाचे सौंदर्य त्याच्या साधेपणात आणि निसर्गात आहे तितकेच ते त्याच्या स्वच्छपणात आहे. दुर्दैवाने आता यातील आहे हे क्रियापद होते असे वापरण्याची वेळ आली आहे. कारण झपाट्याने शहरे होऊ लागलेली आपली गावे आता अत्यंत गलिच्छ होत चालली आहेत. एकेकाळी पेण हे छोटे व टुमदार गाव होते. पण आता तिथली वस्ती अशी काही वाढली आहे की, बऱ्याच भागांना झोपडपट्टीची अवकळा आली आहे. वास्तविक पेणला पाण्याची अडचण नाही. जागेचा वा विस्ताराचाही प्रश्न नाही. पण कोणतेही नियोजन नसल्याने ही पाळी आली आहे. कशीही उभी राहिलेली बांधकामे, सांडपाण्यासाठीची उघडी गटारे ही शहराला घाणेरडे बनवतात. असे अनेक गावांच्या बाबत होऊ लागले आहे. किनारपट्टीच्या गावातील सांडपाणी समुद्रात सोडले जाते. त्यामुळे काही वेळेला घाण नजरेआड होते. पण समुद्र खराब होतो. ती घाण व ते प्लास्टिक भरतीच्या वेळी किंवा पावसाळ्यात समुद्र साभार परत करतो. मग पुळणीवर घाणीचे ढीग साठतात. ते वेळीच साफ होत नाहीत. प्लास्टिकची विल्हेवाट कशी लावायची याचे काहीच नियोजन नसते. येत्या काळात वस्ती आणि पर्यटन वाढतच जाणार आहे. ते पाहता ब्लू फ्लॅग मिळालेल्या तीन किनाऱ्यांसहित सर्वच गावांमध्ये विकासाचे नीट नियोजन करण्याची गरज आहे. या ठिकाणांना जोडणारे रस्ते अत्यंत दयनीय अवस्थेत आहेत. दापोली, श्रीवर्धन किंवा गुहागर गावातील जुने रस्ते बैलगाडीच्या काळातील आहेत. त्यामुळे ते विस्तारण्याला कमी वाव आहे. ते लक्षात घेऊन काही नवीन उपाय करायला हवेत. गाड्या बाहेर ठेवून सायकलींनी फिरण्याच्या व्यवस्थेसारख्या उपायांचा विचार करायला हवा. हे आता केले नाही तर आणखी काही वर्षांनी या सर्व स्थळांची मुंबईची चौपाटी होईल व कपाळावर हात मारून घेण्याची पाळी येईल. कोकणाचा सह्याद्रीकडचे डोंगरभाग असो की पश्चिमेकडचे समुद्रकिनारे, हे आपल्याला निसर्गाने दिलेले दान आहे. पण ते आपोआप टिकणार नाही. ते टिकवावे लागेल. त्यासाठी नियोजन करावे लागेल. आपल्याकडे कोकणाचा विकास म्हणजे मुंबईहून येण्यासाठी अधिक मोठे रस्ते, मोठे उद्योग, हॉटेल्स असे राजकारण्यांच्या डोक्यात असते. त्याऐवजी कोकणाचे सौंदर्य व स्वच्छता जपण्यासाठी अधिक विचार, कडक नियम आणि शिस्त आणण्याची गरज आहे. श्रीवर्धन, लाडघर आणि गुहागर या तीन गावांना मानांकन मिळाले आहे. तर त्यापासूनच या नियोजनाची सुरुवात करता येईल.

विचार

संघर्ष विकास आणि पर्यावरणातला

तुकाराम महाराजांनी शतकांपूर्वी 'वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें' असा शाश्वत जगण्याचा मूलमंत्र दिला होता; मात्र आज हा मंत्र जणू भिंतींवर लिहिण्यापुरताच उरला आहे. कल्याण-डोंबिवली परिसरातील टोरेंट वीज प्रकल्पासाठी प्रस्तावित वृक्षतोडीमुळे पुन्हा एकदा 'विकास विरुद्ध पर्यावरण' हा संघर्ष पेटला असून, सत्तेतील अंतर्गत मतभेद, राजकीय भूमिका आणि पर्यावरणाचा ऱ्हास यांमुळे एक अत्यंत गंभीर पेच निर्माण झाला आहे.



भास्कर खंडागळे

महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक पटलावर सध्या 'विकास की निसर्ग' हा वाद अत्यंत उग्र रूप धारण करताना दिसत आहे. कल्याण आणि डोंबिवली परिसरातील 'टोरेंट पॉवर'च्या वीज प्रकल्पाशी संबंधित कामासाठी हजारो झाडांवर कुऱ्हाड चालवण्याची तयारी सुरू होताच स्थानिक नागरिकांपासून पर्यावरण चळवळीतील कार्यकर्त्यांपर्यंत संतापाची लाट उसळली आहे. एका बाजूला वाढत्या नागरीकरणाची विजेची वाढती भूक भागवण्यासाठी पायाभूत सुविधांची तातडीची निकड सांगितली जात आहे, तर दुसऱ्या बाजूला सिमेंटच्या जंगलात शिल्लक राहिलेला मोजका हिरवा श्वासही ओरबाडून काढण्याचा क्रूर प्रयत्न असल्याची भावना व्यक्त होत आहे. पर्यावरणवाद्यांनी या वृक्षतोडीवर घेतलेला आक्षेप अत्यंत रास्त आणि वैज्ञानिक आधारावर उभा आहे. कल्याण-डोंबिवली आणि ठाणे पट्टा हा आधीच वाढत्या प्रदूषणामुळे, खाडीकिनाऱ्याच्या अतिक्रमणांमुळे आणि अनियंत्रित बांधकामांमुळे हवामानाच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील बनला आहे. अशा भागात उभी असलेली जुनी, दाट सावली देणारी आणि स्थानिक जैवविविधतेला सांभाळणारी झाडे एका रात्रीत तोडणे म्हणजे नागरिकांच्या फुप्फुसांवर थेट आघात करण्यासारखे आहे. पर्यावरणतज्ज्ञांचे म्हणणे आहे, की पर्यायी जागेचा शोध न घेता किंवा विजेच्या लाईनचे व उपकेंद्रांचे डिझाइन न बदलता थेट हिरवाईचा बळी देणे ही प्रशासकीय अनास्था दर्शवते. 'झाडे लावा, झाडे जगवा'च्या सरकारी जाहिरातींवर कोट्यवधी रुपये खर्च करायचे आणि प्रत्यक्ष प्रकल्पाची वेळ आली की सर्वप्रथम झाडांवरच कुऱ्हाड चालवायची, हा विरोधाभास आता लपून राहिलेला नाही.

या वादावर राज्य सरकारची भूमिका नेहमीप्रमाणेच बचावात्मक आणि विकासाचा अपरिहार्य दाखला देणारी राहिली आहे. वाढत्या लोकसंख्येला सुरळीत, विनाव्यत्यय वीजपुरवठा करणे हे सरकारचे प्राथमिक कर्तव्य असून टोरेंट वीज प्रकल्पाचे सब स्टेशन हे भविष्यातील वीज संकट टाळण्यासाठी गरजेचे आहे, असा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. शिवाय, तोडल्या जाणाऱ्या झाडांच्या बदल्यात इतरत्र रोपे लावून 'भरपाई वनीकरण' केले जाईल, असा गुळगुळीत युक्तिवाद केला जातो; परंतु पन्नास-साठ वर्षे जुने वटवृक्ष, पिंपळ किंवा उंबराच्या एका झाडाची पर्यावरणीय परिसंस्था ही नुकत्याच लावलेल्या लहान रोपांनी कधीही भरून येत नाही, हा निसर्गनियम सरकार सोयीस्करपणे विसरताना दिसते. विशेष म्हणजे, या वृक्षतोडीच्या मुद्द्यावरून सत्ताधारी महायुतीतच उघड मतभेद चव्हाट्यावर आले आहेत. एकाच आघाडीत असलेले स्थानिक लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ नेते यांच्यात ताळमेळ नसल्याचे स्पष्ट झाले आहे. स्थानिक पातळीवर नागरिकांचा वाढता रोष पाहता, सत्तेतील काही घटक या वृक्षतोडीला जाहीर विरोध करत आहेत किंवा प्रकल्प स्थलांतरित करण्याची मागणी करत आहेत, तर दुसरीकडे प्रशासकीय पातळीवर प्रकल्प पुढे रेटण्याचा प्रयत्न सुरू आहे. सत्तेतील अंतर्गत रस्सीखेच आणि श्रेयवादाच्या लढाईत मूळ पर्यावरणाचा प्रश्न बाजूला पडू नये, हीच नागरिकांची अपेक्षा आहे. सत्तेतीलच एक घटक विरोधात उभा राहतो, तेव्हा प्रकल्पाच्या नियोजनात आणि निर्णयप्रक्रियेत पारदर्शकतेचा किती अभाव होता, हे अधोरेखित होते.

या संपूर्ण लढ्यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उडी घेतल्याने या वादाला राजकीय धार आली. राज यांनी नेहमीप्रमाणेच प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर बोट ठेवत, 'विकासाच्या नावाखाली सामान्य माणसाचा श्वास का हिरावून घेतला जात आहे?' असा टोकदार सवाल उपस्थित केला. उद्योग किंवा विजेच्या पायाभूत सुविधांना कोणाचाही विरोध असण्याचे कारण नाही; परंतु मुंबई-ठाणे पट्ट्यातील झाडेच नेहमी का टार्गेट केली जातात, असा प्रश्न त्यांनी लावून धरला. मनसेच्या या आक्रमक भूमिकेमुळे स्थानिक पातळीवर चळवळीला मोठे पाठबळ मिळाले असून प्रशासनाला पावले मागे घेण्याशिवाय गत्यंतर उरलेले नाही. याच संवेदनशील विषयावर ज्येष्ठ अभिनेते आणि निसर्गप्रेमी सयाजी शिंदे यांनी ठाम भूमिका घेतली. 'सह्याद्री देवराई'च्या माध्यमातून लाखो झाडे लावून पोटच्या पोरासारखी जगवणाऱ्या सयाजी शिंदे यांनी झाडे केवळ कागदावरची आकडेवारी नसतात, ती जिवंत जीव असतात, असे म्हटले. विकास नक्की माणसांसाठी आहे की सिमेंट-काँक्रीटच्या मक्तेदारांसाठी, असा प्रश्न त्यांनी आहे. सयाजी शिंदे यांच्यासारख्या कलावंताने थेट रस्त्यावर उतरून वृक्षतोडीविरोधात आवाज उठवला, तेव्हा या विषयाचे गांभीर्य राज्यभरातील जनतेपर्यंत पोहोचले. त्यांचे हे म्हणणे अधोरेखित करते, की निसर्गाची हानी करून मिळवलेला विकास हा अंतिमतः मानवी अस्तित्वाचाच विनाश ठरतो. येथे स्पष्ट केले पाहिजे, की महाराष्ट्राला, पर्यावरणवाद्यांना, विकासाला केलेला हा सरसकट विरोध नाही.

वीज, रस्ते, रेल्वे, मेट्रो आणि उद्योग हे राज्याच्या आर्थिक प्रगतीसाठी अत्यावश्यक आहेत; परंतु कळीचा मुद्दा हा आहे की, त्यासाठी आपण नेमकी किती आणि काय किंमत मोजायची हे ठरवण्याची वेळ आली आहे. हवामानबदलाचे संकट आता केवळ आंतरराष्ट्रीय परिषदांमधील चर्चेचा विषय उरलेला नाही, तर ते आपल्या दाराशी येऊन ठेपले आहे. कधी अवकाळी पाऊस, कधी तीव्र दुष्काळ, तर कधी शहरांमध्ये निर्माण होणारे उष्णतेचे बेट हे निसर्गाचा समतोल बिघडल्याचे थेट पुरावे आहेत. विकासाचा आराखडा तयार करताना झाडांना 'अडथळा' समजण्याची मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत हा संघर्ष असाच सुरू राहील. महाराष्ट्रात विकासाच्या हट्टापायी झाडांवर कुऱ्हाड चालवण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. मुंबईतील आरे कॉलनीतील मेट्रो कारशेडचा संघर्ष संपूर्ण देशाने पाहिला आहे. मुंबईचे फुप्फुस मानल्या जाणाऱ्या 'आरे'मधील हजारो झाडे रात्रीच्या अंधारात, पोलिसांचा पहारा ठेवून कापली गेली. नागरिकांनी, तरुणांनी आंदोलने केले, अश्रू ढाळले, तरीही सत्तेच्या बळावर निसर्गाचा गळा घोटला गेला. त्याचप्रमाणे नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी उभारण्यात येणाऱ्या साधुग्रामसाठी हजारो झाडांवर कुऱ्हाड चालवण्याचा घाट घातला गेला होता. साधू-संतांच्या वास्तव्यासाठी आणि तात्पुरत्या तंबूंसाठी अनेक दशके जुनी झाडे तोडणे हा संतांच्या भूमीतच संतांच्या शिकवणुकीचा केलेला अनादर नव्हता का? अशाच घटना राज्याच्या कानाकोपऱ्यात घडत आहेत. समृद्धी महामार्ग, पुणे-बंगळुरू महामार्गाचे रुंदीकरण वा इतर प्रकल्पांसाठी रस्त्यांच्या कडेला शतकानुशतके उभे असलेले महाकाय वृक्ष भुईसपाट केले जातात.

विकास प्रकल्प आखताना उपलब्ध पर्यायांचा, भुयारी मार्गांचा, पुनर्स्थापनेचा प्रामाणिकपणे विचार का केला जात नाही? वृक्ष प्रत्यारोपणाचे सरकारी आकडे हे केवळ फसव्या कागदांपुरतेच मर्यादित असतात. प्रत्यक्षात प्रत्यारोपण केलेली नव्वद टक्क्यांहून अधिक झाडे योग्य देखभालीअभावी मरून जातात, हे अनेक पाहणी अहवालांमधून सिद्ध झाले आहे. प्रशासनाला आणि राज्यकर्त्यांना हे समजून घ्यावे लागेल, की शुद्ध हवा, पाणी आणि गारवा देणारे झाड हे कोणत्याही फॅक्टरीपेक्षा अथवा वीज उपकेंद्रापेक्षा मानवासाठी कमी मोलाचे नाही. श्वास घेण्यासाठी शुद्ध हवाच उरणार नसेल, तर त्या २४ तास उपलब्ध असणाऱ्या विजेचा वा चकचकीत सिमेंटच्या रस्त्यांचा उपयोग कोणासाठी? टोरेंट वीज प्रकल्पाच्या निमित्ताने उठलेला आवाज हा केवळ कल्याण-डोंबिवलीपुरता मर्यादित नसून, संपूर्ण महाराष्ट्रातील संवेदनशील मनांचा आक्रोश आहे. संतांनी आपल्याला झाडांमध्ये 'सोयरे' (नातेवाइक) पाहण्याची दृष्टी दिली होती. आज आपण त्याच सोयऱ्यांना आपल्या स्वार्थासाठी, लालसेसाठी आणि नियोजनशून्य विकासासाठी बळी देत आहोत. टोरेंट प्रकल्पाबाबत सरकारने आता तरी आडमुठेपणा सोडून, सर्वपक्षीय सहमतीने आणि पर्यावरणतज्ज्ञांच्या सल्ल्याने पर्यायी जागेचा मार्ग निवडायला हवा. महायुती असो वा विरोधक; निसर्गाच्या प्रश्नावर राजकारणाचा चिखल न फेकता शाश्वत विकासाचे धोरण स्वीकारणेच सर्वांच्या हिताचे आहे.

शेवटी संत एकनाथ महाराजांच्या शब्दांमध्ये सांगायचे तर, निसर्गाशी कृतघ्न राहून कोणतीही मानवी संस्कृती समृद्ध होऊ शकत नाही. विकासाची व्याख्या केवळ काँक्रीटच्या जंगलाने नव्हे, तर टिकून राहिलेल्या हिरव्यागार जंगलांनी आणि शुद्ध हवेने ठरवण्याची वेळ आता आली आहे. अन्यथा, पुढील पिढ्या आपल्याला या पर्यावरणीय विनाशासाठी कधीही माफ करणार नाहीत.

चर्चा आजची

भक्तीच्या यात्रेवर यंत्र वरचढ?

रायगड जिल्ह्याला यात्रांची समृद्ध परंपरा लाभली आहे. भात कापणीचा हंगाम संपल्यानंतर कार्तिकी एकादशीपासून यांत्रांचा उत्सव सुरू होतो. त्याची सुरूवात खालापूर तालुक्यातील साजगावच्या बोंबल्या विठोबाच्या यात्रेपासून होते. त्यापाठोपाठ अलिबाग तालुक्यातील आवास, कनकेश्वर, वरसोली आणि चौल-भोवाळे येथील यात्रांमुळे डिसेंबरअखेरपर्यंत रायगड जिल्हा भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाच्या वातावरणात न्हाऊन निघणार आहे. परंतु, हल्ली भक्तीच्या यात्रेपेक्षा यंत्राची यात्राच जास्त अनुभवायला मिळत आहे. त्यामुळे भक्तीच्या यात्रेवर यंत्र वरचढ होण्याची भीती स्थानिकांमधून वर्तविली जात आहे.

खरंतर यात्रा भरविण्यामागे धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक अशी अनेक कारणे आहेत. भारतात विशेषतः महाराष्ट्रातील ग्रामीण आणि शहरी भागातील जीवनाचा अविभाज्य भाग आहे. प्रत्येक गावातील एका ग्रामदैवतेच्या वार्षिक उत्सवाच्या निमित्ताने यात्रा भरवली जाते. वर्षभरात शेती किंवा व्यवसायात चांगले यश मिळावे, कुटुंबाचे रक्षण व्हावे यासाठी लोक नवस बोलतात.

संतोष राऊळ

यात्रेच्या निमित्ताने पंचक्रोशीतील भाविक एकत्र येतात आणि देवाचे आभार मानत नवस फेडतात. अनेक ठिकाणी संतांच्या पुण्यतिथीनिमित्त किंवा समाधी सोहळ्यानिमित्त यात्रा भरवल्या जातात. तसेच, यात्रेच्या निमित्ताने गावातील मतभेद विसरून सर्व जाती-धर्मांचे आणि वेगवेगळ्या स्तरातील लोक एकत्र येतात. त्यामुळे त्यांच्यातील एकोपा देखील वाढतो. त्याचबरोबर कामानिमित्त बाहेरगावी गेलेले गावकरी, माहेरवाशिणी आणि नातेवाईक या निमित्ताने गावी परत येतात. त्यामुळे कौटुंबिक नाती अधिक घट्ट होतात. तसेच, यात्रा हे ग्रामीण भागातील मोठे बाजारपेठेचे ठिकाण असते. या यात्रेत शेतीची अवजारे, घरगुती भांडी, कपडे, खेळणी, मिठाई आणि जनावरांची मोठी खरेदी-विक्री होते. त्यामुळे लहान व्यावसायिकांसह कारागीर, फेरीवाले आणि कलावंतांना यात्रेत कमाई करण्याची संधी मिळते.

पुर्वी यांत्रांमध्ये कलावंतांना देखील आपली कला साजरी करण्याची मोठी संधी मिळत असे. त्यात तमाशा, लावणी, भारूड, गोंधळ, दशावतार, कीर्तन आणि भजन यांसारख्या पारंपारिक कला सादर केल्या जात असत. त्यामुळे स्थानिक संस्कृती आणि कला जिवंत राहिली होती. काही ठिकाणी तर कुस्त्यांचे फड, बैलगाडा शर्यत, भजन स्पर्धा यांसारख्या पारंपारिक खेळांचे देखील आयोजन केले जात असे. त्यामुळे लोकांचे खऱ्या अर्थाने मनोरंजन व्हायचे. परंतु, आता या यात्रेतून कला आणि मानवी खेळ लोप पावल्याचे जुन्या पिठीकडून बोलले जात आहे. या पारंपारिक मनोरंजनाची जागा आता मोठंमोठ्या यंत्रावर चालणाऱ्या पाळण्यांनी घेतल्याचे निदर्शनास येत आहे.

कार्तिकी एकादशीला म्हणजेच शनिवारी खालापूर तालुक्यातील प्रतिपंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या साजगाव येथील विठ्ठलाचा उत्सव सुरू झाला. त्यानंतर सोमवारी अलिबाग तालुक्यातील आवास येथील नागेश्वर यात्रा पार पडली असून, मंगळवारी आणि बुधवारी कनकेश्वर यात्रा होणार आहे. लगेचच वरसोली येथील विठ्ठल-रखुमाई मंदिरात दि.४ डिसेंबरपासून उत्सवाला सुरुवात होणार असून, त्यानिमित्त पाच दिवस यात्रा भरणार आहे. तर, चौल-भोवाळे येथे दि.२३ डिसेंबरपासून दत्तजयंती सोहळा आणि यात्रेची लगबग सुरू होणार आहे. या प्रमुख यात्रांमुळे दरवर्षीप्रमाणे यंदाही नोव्हेंबर आणि डिसेंबर महिना उत्सवमय होणार आहे. यंदाही खाद्यपदार्थ, घरगुती वस्तू, पूजेचे साहित्य आणि खेळण्यांची दुकाने सजणार असल्यामुळे स्थानिक व्यापारी, छोटे व्यावसायिक आणि विक्रेत्यांना रोजगाराची संधी मिळणार आहे. यात्रांच्या निमित्ताने ग्रामीण बाजारपेठांमध्ये भाविकांची मोठी गर्दी होणार असून, मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल वाढण्याची शक्यता वर्तविली जात आहे. तसेच, वाढणाऱ्या धार्मिक विधींसह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची देखील रेलचेल राहणार आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून सांस्कृतिक कार्यक्रमांकांसह स्थानिक व्यावसायिकांकडे देखील आतीची पिढी पाठ फिरवत असल्याचे बोलले जात आहे.

हल्लीच्या यात्रांमध्ये मोठ्या प्रमाणात यंत्रावर चालणारे पाळणे निदर्शनास येतात. हे पाळणे बहुतांश परप्रांतिय लोकांचेच असतात. आज इकडची यात्रा संपली रे संपली की उद्या लगेच दुसऱ्या ठिकाणच्या यात्रेसाठी तळ ठोकून ठेवला जातो. ही लोकं कुठून येतात हे कोणालाच माहिती नसतं. त्यांची ओळख महत्त्वाची नसली तरी, त्यांच्याकडून उभारले जाणारे पाळणे किती सुरक्षित असतात, याची देखील कोणाला पर्वा असलेली दिसत नाही. पुर्वी १०-२० रुपयाचे टिकीट खरेदी करताना १०० वेळा विचार केला जायचा. परंतु, आता १०० रुपयाचं तिकिट खरेदी करताना १०-२० सेकंदाचा देखील विचार केला जात नाही. या यंत्राच्या खेळामुळे सांस्कृतीक कार्यक्रम, पारंपारिक खेळ आणि स्थानिक व्यावसायिकांनी विक्रीसाठी आणलेल्या वस्तूंकडे आताच्या भाविकांकडून पाठ फिरवली जात असल्याचे स्थानिका व्यापाऱ्यांकडून बोलले जात आहे. आजच्या युगात प्रत्येक गोष्टीत बदल होणं गरजेचं आहेच, परंतु त्यात स्थानिकांचे मरण होईल अशीही परिस्थीती उपस्थित होऊ नये. यंत्रांच्या पाळणे जेथे उभे केले जातात त्याचं भाडं जागामालकाला आणि संबंधित प्रशासनाला भेटतं. मात्र, तोच व्यवसाय करायला स्थानिकांना प्रोत्साहन दिल्यास त्यांच्यासह स्थानिकांचा देखील मोठा फायदा होऊ शकेल. आणि या यंत्राच्या यात्रेत सांस्कृतीक कार्यक्रम, पारंपारिक खेळासह ज्याच्या नावाने यात्रा भरवली जाते त्याचा देखील प्रचार करून आताचे भाविक त्याकडे कसे वळतील याचा प्रयत्न करणे देखील गरजेचे असल्याचे स्थानिकांसह कलावंतांकडून बोलले जात आहे. नाहीतर उद्या भक्तिच्या यात्रेवर यंत्रच वरचढ होण्याची भीती स्थानिकांसह ज्येष्ठ भक्तांकडून वर्तविली जात आहे.

लोकसंसद

अंधश्रद्धा संपणार कधी ?

महान समाजसुधारक आणि संतांची परंपरा असलेल्या पुरोगामी महाराष्ट्रातील अंधश्रद्धा संपायच्या कधी असा प्रश्न पडतो. महाराष्ट्र हे देशातील प्रगतशील राज्य समजले जाते, पण याच राज्यात काही लोक अंधश्रद्धेच्या आहारी गेले आहेत. आजचे युग हे विज्ञान युग आहे आणि या विज्ञान युगातही काही लोक



भूत- खेत, जादूटोणा, मुठ मारणे, करणी, भानामती, चेटकीण, हडळ, गुप्तधन, पुनर्जन्म, पाप - पुण्य, स्वर्ग - नरक अशा भ्रामक कल्पनांना चिटकून बसलेले दिसतात. भोंदूबाबाबांनी तर आपल्या राज्यात उच्छाद मांडला आहे. अशिक्षितच नाही तर सुशिक्षित लोकही भोंदूबाबांच्या हातचलाखीला फसतात. भोंदूबाबांकडून फसवणूक झाल्याची एकतरी बातमी वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. अंनिस सारख्या संघटना आपल्या परीने भोंदूबाबा आणि अंधश्रद्धे विरुद्ध जनजागृती करत असतात तरीही काही लोकांमध्ये अजूनही सुधारणा होताना दिसत नाही ते अजूनही अंधश्रद्धेला कवटाळून बसले आहेत. २०१३ मध्ये महाराष्ट्रानेच सर्वप्रथम जादूटोणा विरोधी कायदा संमत केला. जादूटोणा विरोधी कायदा संमत करूनही समाजातील अंधश्रद्धा कमी होत नाही. जादूटोणा विरोधी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी व्हायला हवी.

- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे

दिनविशेष

थोर शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस

थोर शास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस हे भारताचे पहिले जीवशास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ व वनस्पतीशास्त्रज्ञ होते. जगदीशचंद्र बोस यांनी वनस्पतींमध्ये देखील प्राण्यांप्रमाणे संवेदना असतात हे हे प्रयोगाद्वारे सिद्ध केले. ऊन, पाऊस, थंडी, प्रकाश, ध्वनी यामुळे प्राण्यांप्रमाणे वनस्पतींमध्येही संवेदना निर्माण होतात हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी सेस्कोग्रफ नावाचे यंत्र बनवले. या यंत्राने वनस्पतींची संवेदना दहा हजार पटीने मोठी करून बघता येणे शक्य झाले. सेस्कोग्राफ हे यंत्र वनस्पती शास्त्रासाठी वरदान ठरले.

जगदीशचंद्र बोस यांचा जन्म ३० नोव्हेंबर १८५८ रोजी बंगालमधील मैमनसिंग येथे झाला त्यांचे वडील भगवानसिंग बोस हे सरकारी अधिकारी होते. लहानपणापासूनच जगदीशचंद्र बोस यांना आजूबाजूचा निसर्ग पाहायचे, त्याचे निरीक्षण करण्याची आवड होती. झाडे, पाने - फुले, प्राणी, पक्षी, फुलपाखरे यांचे निरीक्षण करणे हा त्यांचा आवडता छंद होता. जगदीशचंद्र बोस यांचे प्राथमिक शिक्षण गावातल्या शाळेत झाले. कोलकोता येथील सेंट झेवियर्स कॉलेजमधून इंटर मीडियट होऊन, कोलकोता युनिव्हर्सिटी मधून भौतिकशास्त्र व डॉक्टरकीचा अभ्यास करून इंग्लंडच्या ख्राईस्ट चर्च महाविद्यालयातून भौतिकी, रसायन, वनस्पतीशास्त्र व निसर्गशास्त्र यांचा अभ्यास करून भारतात परतले.

१८८५ साली ते भारतात परतल्यावर कोलकोत्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये भौतिकीच्या प्राध्यापक पदावर रुजू झाले. या पदावर रुजू होणारे ते पहिलेच भारतीय असल्यामुळे त्यांना वर्णभेदाला तोंड द्यावे लागले; पण काही वर्षांनंतर त्यांची योग्यता ओळखल्यावर असामान्य शास्त्रज्ञात त्यांची गणना होऊ लागली. १८८५ ते १८९५ या काळात भौतिकशास्त्र शिकवत असताना त्यांनी विद्युत शक्तीवर संशोधन केले. विद्युत चुंबकीय तरांगाचा शोध लावून त्यांनी बॅटरी बनवली. या शोधाची कीर्ती जगभर पसरली. प्रसिद्ध शास्त्रज्ञ पोईनकर आणि जे. जे. थॉम्पसन यांच्या लेखात या शोधाचा उल्लेख आहे. नेमलाईटच्या मदतीने संदेश पाठवण्यातही त्यांना यश मिळाले. विद्युत शक्तिवरील संशोधनानंतर जगदीशचंद्र बोस वनस्पती शास्त्राकडे वळले. सचेतन आणि अचेतन वस्तूंमधील साम्य आणि भेद यांचा त्यांनी अभ्यास केला. त्यांनी या विषयावर लिहिलेल्या निबंधांना व दिलेल्या व्याख्यानांना सुरवातीला व्यापक मान्यता मिळाली नाही. १९२० साली त्यांना रॉयल सोसायटीची फेलोशिप मिळाली. सण १९३६ मध्ये त्यांनी कोलकोत्यात बोस इन्स्टिट्यूट रिसर्चची स्थापना केली. संस्थेचे मुखपत्रही सुरू केले. जगदीशचंद्र बोस यांनी इरीटेबीलिटी ऑफ प्लॅन्टस, इलेक्ट्रोफीजिओलॉजी ऑफ प्लॅन्टस. ट्रॉपीक मुव्हमेंट अँड ग्रोथ ऑफ प्लॅन्टस, द नर्व्हस मेकॅनिजम ऑफ प्लॅन्टस, प्लॅन्टरिस्पॉन्स १९०६, लाईफ मुव्हमेंट प्लॅन्टस् (भाग १ ते ४) द फिजीऑलॉजी ऑफ फोटोसिंथेसिस, मोटार मेकॅनिजम ऑफ प्लॅन्टस्, रिस्पॉन्सेस इन द लिव्हिंग अँड नॉन लिव्हिंग १९०६ इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. केंब्रिज विद्यापीठाने

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२३ नोव्हेंबर

१) श्री. प्रभाकर राजाराम सुर्वे
नागाव, अलिबाग,
२३-११-१९४३

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

वाढदिवस साजरा करा अन्नदानाने

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

नागोठणे येथील तरुण बेपत्ता

। नागोठणे । प्रतिनिधी ।

नागोठण्यातील कुंभारआळी परिसरात राहणारे युवराज मगर हे सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास कामावर जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडले होते. मात्र, ते अद्याप घरी परतले नसल्याने ते बेपत्ता झाल्याची नोंद नागोठणे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



युवराज मगर यांची पत्नी कोकिळा मगर यांनी दिलेल्या माहितीनुसार, युवराज हे कामावर जात असल्याचे सांगून घरातून निघून गेले होते. मात्र बराच वेळ होऊनही ते घरी परतले नाहीत. बेपत्ता झालेल्या तरुणाच्या वर्णनामध्ये या तरुणाचा रंग सावळा असून केस काळे व चेहरा उभट आहे. तरुणाची उंची अंदाजे १६४ सेंटीमीटर असून बेपत्ता होताना त्याच्या अंगावर खाकी रंगाची फुल पॅन्ट, निळ्या रंगाचा हाफ शर्ट आणि पायात चप्पल परिधान केल्याचे मिसिंग तक्रारीत नमूद केले आहे.

सिडकोची अतिक्रमणांवर धडक कारवाई

■ बांधकामांसह राडारोडा वाहतूक करणाऱ्यांवरही गुन्हे दाखल

। पनवेल । प्रतिनिधी ।

सिडकोच्या अधिसूचित भूखंडांवरील अनधिकृत बांधकामे आणि मोकळ्या जागांवर होणारे राडारोड्याचे अनधिकृत डम्पिंग रोखण्यासाठी सिडकोने कारवाईचा वेग वाढवला आहे. १८ आणि १९ नोव्हेंबर रोजी कोपरखैरणे, द्रोणागिरी, नवघर, पागोटे आणि घणसोली परिसरात निष्कासन मोहीम राबवून अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे हटवण्यात आली. त्याचबरोबर सिडकोच्या मोकळ्या जागांवर विना पवानगी राडारोडा टाकणाऱ्या तीन डंपरचालकांविरोधात पोलिसांत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



सिडको मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अश्विन मुद्गल यांनी सिडकोने अधिसूचित केलेल्या जमीनीवरील अनधिकृत बांधकामांवरील नियंत्रण, अतिक्रमन रोखणे आणि अवैध राडारोडा टाकणाऱ्यांवर गुन्हे नोंदविण्याची जबाबदारी दक्षता विभागाचे प्रमुख सुरेश मेंगडे यांच्या खांद्यावर सोपवली आहे. त्या कारवाईनूसार १८ नोव्हेंबरला कोपरखैरणे सेक्टर १२ सी येथील मौजे खैरणे सर्वे क्रमांक १४, १५ आणि १६० या सिडको अधिसूचित भूखंडांवर उभारण्यात येत असलेल्या तळमजला अधिक चार मजली आरसीसी इमारतीचे दिड हजार चौरस मीटर क्षेत्रफळाचे बांधकाम पाडण्यात आले. या कारवाईसाठी क्रशर-बूम मशीन, दोन पोकलेन आणि जेसीबीचा वापर करण्यात आला.

द्रोणागिरी नोडमधील जेएनपीए परिसरासह नवघर आणि पागोटे येथे ढाबे, गॅरेज आणि पदपथांवरील अतिक्रमणे हटवण्यात आली. यासाठी जेसीबी, दोन जीप आणि दहा कामगारांची मदत घेण्यात आली. त्याच दिवशी घणसोली सेक्टर २० मधील घणसोली सर्वे क्रमांक १२१ आणि १२२ येथे समाधान मोटे यांच्या सुरू असलेल्या आरसीसी बांधकामावरही कारवाई करण्यात आली. या बांधकामाचे २० स्लॅब, दोन जिने, अंतर्गत भिंती, स्वयंपाकघरातील ओटे आणि स्नानगृहांचे भाग ब्रेकरच्या साहाय्याने तोडण्यात आले. यापूर्वीही या बांधकामावर कारवाई करण्यात आली होती. पुन्हा बांधकाम सुरू झाल्याने दुसऱ्यांदा तोडकाम मोहीम राबवण्यात आली.

तसेच सिडकोच्या अधिसूचित जागांवर राडारोडा टाकणाऱ्या डंपरचालकांविरोधातही कारवाई करण्यात आली. १८ नोव्हेंबर रोजी कामोठे परिसरात एक डंपर पकडण्यात आला. तर १९ नोव्हेंबर रोजी खारघर परिसरात दोन डंपरचालकांना राडारोडा टाकताना पकडण्यात आले. याप्रकरणी कामोठे आणि खारघर पोलीस ठाण्यांत दोन वेगवेगळे गुन्हे नोंदविण्यात आले.

सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी मेंगडे यांच्या निर्देशानुसार आणि मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे विशाल ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहिमा राबवण्यात आल्या.

पद्मदुर्ग किल्ल्यावर तात्पुरती जेट्टी उभारावी

■ अशिलकुमार ठाकूर यांची मागणी

। कोर्लई । प्रतिनिधी ।

मुरूड पद्मदुर्ग जागर व गड भ्रमण सामाजिक संस्था, कोकण कडा मित्र मंडळ रायगड व सर्व संलग्न शिवप्रेमी संस्थांच्या वतीने पद्मदुर्ग जागर सोहळा २ जानेवारी रोजी साजरा करण्यात येत असून रायगड जिल्ह्याचे खासदार सुनील तटकरे, पालकमंत्री भरत गोगावले, मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांनी पद्मदुर्ग किल्ल्यावर ये-जा करण्यात तात्पुरती जेट्टी उभारण्यात संबंधित प्रशासनाला योग्य ते आदेश द्यावेत, अशी मागणी पद्मदुर्ग जागर व गड भ्रमण समितीचे अध्यक्ष अशिलकुमार ठाकूर यांनी केली आहे.



पद्मदुर्ग जागर सोहळा गेली १७ वर्ष पद्मदुर्ग किल्ल्यात साजरा करण्यात येत असून यंदा १८ वे वर्षे आहोत जेणेकरून या कार्यक्रमातुन शासनाला जाग येईल आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा किल्ल्याचे संवर्धन व जतन होईल हाच मुख्य हेतू हा कार्यक्रम घेण्याचा आहे. तरी शासनाने जागे होऊन पद्मदुर्ग किल्ल्याकडे लक्ष द्यावे येणाऱ्या २ जानेवारी रोजी पद्मदुर्ग जागर सोहळा संपन्न होणार आहे. यादिवशी सकाळपासून राधाकृष्ण मंदिर ते जेट्टी पर्यत पालखी प्रस्थान, गड स्वच्छता, गड सजावट, गड पूजन, गडदेवता श्री. कोटेश्वरी माता पूजन, छत्रपती श्री. शिवाजी महाराज प्रतिमा अभिषेक व पूजन, व्याख्यान, मर्दानी खेळ, गडकोट शिवपालखी सोहळा, श्री.कोटेश्वरी माता दर्शन व आरती, महाप्रसाद आदी भरगच्च कार्यक्रमांची दुर्गप्रेमींना पर्वणी ठरणार आहे.याठिकाणी किल्ल्यावर जाण्यासाठी जेट्टी नसल्याने दुर्गप्रेमी व पर्यटकांना त्रास सहन करावा लागतो आहे. मागील वर्षी याठिकाणी झालेल्या पद्मदुर्ग जागर सोहळ्यात आमदार अनिकेत तटकरे यांनी खासदार सुनील तटकरे यांच्या माध्यमातून जेट्टी उभारण्यात प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासित केले होते. स्थानिक लोकप्रतिनिधी व शासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी यात तातडीने लक्ष पुरवून पद्मदुर्ग जागर सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर किल्ल्यावर तात्पुरती जेट्टी उभारण्यात यावी, अशी मागणी अशिलकुमार ठाकूर यांनी केली आहे.

दोन मोबाईलचा केला अपहार

नवीन पनवेल : दोन मोबाईलचा अपहार केल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात अभिषेक जयपाल सिंग यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. २५ ऑक्टोबर रोजी दुपारी सव्वातीनच्या सुमारास पनवेल क्रोमा शाखा यांनी प्रोडक्ट मिळणे बाबत मेल केला होता. या मेलवरून प्रॉडक्ट डिलिव्हरी करण्यासाठी पोर्टल वरील डिलिव्हरी बॉय अभिषेक सिंग याने दोन लाख ६९ हजार ८०० रुपये किमतीचे एप्पल कंपनीचे दोन मोबाईल खारघर शाखा येथून ताब्यात घेतले आणि पनवेल शाखा येथे न पोहोचवता अपहार केला आणि तो फरार झाला.

एकांकिकांचा महासंग्राम राज्यभर रंगणार

। पनवेल । प्रतिनिधी ।

नवोदित रंगकर्मींच्या कलागुणांना व्यासपीठ मिळवून देणारी प्रतिष्ठेची राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धा यंदा १३व्या वर्षांत पदार्पण करत असून, त्याचा महासंग्राम राज्यभर रंगणार आहे. यामध्ये महाराष्ट्रातील १००हून अधिक एकांकिका संघांनी सहभाग नोंदवला आहे. २१ नोव्हेंबरपासून राज्यातील विविध केंद्रांवर प्राथमिक फेऱ्यांना सुरुवात होणार आहे.

पुणे, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी, नाशिक आणि जळगाव येथे प्राथमिक फेऱ्या पार पडणार आहेत. तर ठाणे, पालघर, कल्याण, मुंबई आणि रायगड विभागासाठी पनवेल केंद्रावर स्पर्धा होईल. स्पर्धेची महाअंतिम फेरी १८ ते २० डिसेंबरदरम्यान आद्यक्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात रंगणार आहे. प्रथम क्रमांकाच्या विजेत्या संघाला एक लाख रुपये आणि मानाचा अटल करंडक, द्वितीय क्रमांकाला ७५ हजार, तर तृतीय क्रमांकाला ५० हजारांचे पारितोषिक देण्यात येणार आहे. मराठी रंगभूमीला नवे कलाकार मिळावेत आणि नवोदितांच्या कलागुणांना प्रोत्साहन मिळावे, हा स्पर्धेचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

करंजा जेट्टीवर माशांचा पाऊस

। उरण । प्रतिनिधी ।

करंजा प्रवासी जेट्टीवर शुक्रवारी सायंकाळी समुद्रात हजारो मासे आले होते. हा कांटा मासा असल्याचे मच्छिमारांचे म्हणणे आहे. समुद्राच्या वाढत्या तपमान आणि प्रदूषणाच्या परिणामी आशा प्रकारच्या घटना घडली आहे, असा अंदाज मासेमारांनी व्यक्त केला आहे. हे मासे पाण्यातील ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाल्यानेही आले असावे असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

यापूर्वी उरणच्या व जेएनपीटी बंदराच्या परिसरात आशा प्रकारच्या घटना घडल्या होत्या. अनेक कारणांनी जल प्रदूषण वाढले आहे. समुद्रात टाकण्यात येणारा कचरा आणि वाढत्या जहाजामुळे पाण्यावरील तेल तवंग आणि याच जहाजातून मोठ्या प्रमाणात टाकण्यात येणारा कचरा यांचाही परिणाम होत आहे. समुद्रातील वाढत्या प्रदूषणाचा परिणाम खोल समुद्रातील मासेमारीवरही होऊ लागला आहे. मासेमारांच्या जाळ्यात प्लास्टिकचे प्रमाणही वाढले आहे. विकासाच्या या प्रक्रियेत समुद्र खाडीत गाळ निर्माण होत आहे. हा गाळ समुद्राच्या आंतरभरतीच्या मासेमारी क्षेत्रात जमा होत आहे. यामुळे समुद्र आणि खाडी मधील माशांचे प्रजनन, स्पॉर्निंग ग्राउंड आणि सागरी वनस्पती यामुळे पारंपरिक मासेमारी क्षेत्र मोठ्या प्रमाणावर नष्ट झाले आहे. त्यामुळे मासे मिळण्याचे प्रमाणही कमालीचे घटले आहे. लॉबस्टर, खेकडे, हिल्सा, ऑक्टोपस, टायगर प्रॉन्स, मडस्कीपर, ग्रुपर्स इत्यादी अनेक माशांच्या प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. समुद्राच्या वाढत्या प्रदूषणामुळे केवळ मासळीवरच नाही तर किनारपट्टीवरील तसेच खाडी भागातील भूगर्भातील पाण्याच्या स्त्रोतावर जलप्रदूषणाचा परिणाम होत आहे. त्यामुळे मानवी जीवनावर परिणाम होण्यास सुरुवात झाली आहे. या प्रदूषणाला जबाबदार असणाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

गेल, उसर येथे रक्तदान शिबीर उत्साहात

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

गेल (इंडिया) लिमिटेड, उसर आणि जिल्हा शासकीय रक्तपेढी, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने गेल कंपनीमध्ये कार्यरत गेल, ईआयएल तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी ऐच्छिक रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ३० युनिट रक्त संकलित करण्यात आले.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन गेलचे कार्यकारी संचालक तथा प्रभारी अधिकारी अनुप गुप्ता यांच्या हस्ते करण्यात आले. कर्मचाऱ्यांमध्ये रक्तदानाबाबत जनजागृती निर्माण व्हावी आणि अधिकाधिक कर्मचाऱ्यांनी या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे, या उद्देशाने अनुप गुप्ता यांनी स्वतः सर्वप्रथम रक्तदान करून शिबिराची सुरुवात केली.या उपक्रमात गेल, उसर, ईआयएल तसेच विविध कंत्राटदारांच्या कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदान केले.

समान नागरी संहितेच्या अनुषंगाने कोकण विभागातील जनसुनावणी

। पनवेल । प्रतिनिधी ।

समान नागरी संहितेबाबत समाजातील सर्व घटकांच्या अपेक्षा, सूचना आणि भूमिका जाणून घेणे आवश्यक आहे. या विषयाचा विचार करताना कोणत्याही घटकाचे म्हणणे दुर्लक्षित राहू नये, यासाठी नागरिकांनी आपले अनुभव, मते आणि सूचना कोणताही संकोच न बाळगता समितीसमोर मांडाव्यात. महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक, सामाजिक संस्था, विविध संघटना तसेच कायदेविषयक क्षेत्रातील जाणकारांनी या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा असे आवाहन समान नागरी संहिता समितीने केले. नागरिकांनी मांडलेल्या प्रत्येक सूचनेचा आणि अभिप्रायाचा समितीच्या अभ्यासप्रक्रियेत विचार केला जाईल, असेही समितीने यावेळी सांगितले. कोकण विभागीय आयुक्त कार्यालयात समान नागरी संहिता जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी जनसुनावणी समितीचे सदस्य माजी न्यायमूर्ती संजय मेहरे, उत्तराखंडचे माजी मुख्य सचिव शत्रुघ्न सिंह, माजी मुख्य सचिव दिनेशकुमार जैन, माजी महाधिवक्ता डॉ. बिरेंद्र सराफ, शिक्षणतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. सुवर्णा रावल, विभागीय आयुक्त श्रीमती रुबल अग्रवाल, समितीच्या सचिव वर्षा ठाकूर-घुगे, विधी सल्लागार तन्वी आनंद आणि जय संकलेचा उपस्थित होते. समितीने समान नागरी संहितेचे व्यापक स्वरूप स्पष्ट करताना भारताची विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरांनी समृद्ध असलेली ओळख जपत नागरिकांच्या वैयक्तिक व कौटुंबिक जीवनाशी संबंधित नागरी बाबींमध्ये समानता, न्याय, सुसूत्रता आणि कायदेशीर स्पष्टता असणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. समिती प्रामुख्याने विवाहासंबंधी कायदेशीर वय, नोंदणी, वैवाहिक हक्क व जबाबदाऱ्या; घटस्फोटाची कायदेशीर प्रक्रिया, कारणे व संबंधित पक्षांचे अधिकार आणि संरक्षण; वारसा व उत्तराधिकार; तसेच लिव्ह-इन रिलेशनशिपमधील व्यक्तींचे कायदेशीर अधिकार, जबाबदाऱ्या आणि संरक्षण या चार विषयांचा अभ्यास करणार असल्याचे समितीने यावेळी स्पष्ट केले. समान नागरी संहितेबाबत नागरिकांना आपली मते, सूचना, प्रश्न आणि अपेक्षा संकेतस्थळावर ऑनलाइन माध्यमातून मांडण्यासाठी १५ डिसेंबर पर्यंत मुदत वाढविण्यात आली असल्याची माहितीही समितीने यावेळी दिली.

१०५ मीटर रस्त्याची दुरूस्ती | **पुढील पावसाळ्यात लागणार कामाची कसोटी**

कशेडी घाटाला गॅबियनचे कवच

। महाड । प्रतिनिधी ।

मुंबई-गोवा महामार्गावरील जुन्या कशेडी घाटातील भोगाव हद्दीतील गेल्या २० वर्षांपासून सातत्याने खचणाऱ्या रस्त्याच्या दुरूस्तीचे काम अखेर पूर्ण झाले आहे. ठेकेदार कंपनीने १०५ मीटर लांबीच्या धोकादायक भागात गॅबियन तंत्राचा वापर करून संरक्षक भिंत उभारण्यासह रस्त्याचे मजबुतीकरण केले आहे. त्यामुळे या डेंजर झोनचा धोका कमी होण्याची अपेक्षा आहे. मात्र, कामाची खरी कसोटी आगामी पावसाळ्यात लागणार आहे.



२००५ मध्ये मोरीच्या कामासाठी केलेल्या ब्लास्टिंगनंतर या ठिकाणी रस्ता खचण्यास सुरुवात झाली होती. दरवर्षी लाखो रुपये खर्चून दुरूस्ती केली जात असली तरी पावसाळ्यात पुन्हा रस्ता खचत होता. त्यामुळे हा परिसर डेंजर झोन म्हणून ओळखला जाऊ लागला. या मार्गावरून पळचिल विभागातील १२ गावे आणि २८ वाड्यांमधील नागरिकांची वाहतूक होत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता.

या समस्येबाबत ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींनी पोलादपूरचे तहसीलदार कपिल घोरपडे तसेच प्रांताधिकारी पोपट ओमासे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. प्रशासनानेही दुरूस्तीच्या कामाला गती देण्याच्या सूचना दिल्या होत्या. पावसाळा आणि युद्धजन्य परिस्थितीमुळे कामात अडथळे आल्याने कंपनीने सुरुवातीला तात्पुरता पर्यायी मार्ग उपलब्ध करून दिला होता.

अखेर ठेकेदार कंपनीने या ठिकाणी खोल जमिनीत कॉंक्रिटीकरण करून रस्त्याचा पाया मजबूत केला.

दरीच्या बाजूला सुमारे १०५ मीटर लांब आणि १५ फूट उंच गेल्व्हनाइज्ड स्टीलच्या जाळीत दगड भरून गॅबियन पद्धतीची संरक्षक भिंत उभारली आहे. तसेच डोंगरभागातून झिरपणाऱ्या पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी गटार व्यवस्थाही करण्यात आली आहे. टिकाऊ बांधकाम साहित्याचा वापर करून रस्त्याचे मजबुतीकरण केल्याची माहिती ठेकेदार कंपनीचे अमित चंदनानी यांनी दिली.

दुरूस्तीचे काम पूर्ण झाले असले तरी या धोकादायक भागात दुपदरी रस्ता अचानक एकपदरी होत असल्याने अपघाताची शक्यता कायम आहे. घाटातील तीव्र वळण आणि उताराामुळे वाहनचालकांना विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. २००५ पासून सातत्याने खचणाऱ्या रस्त्याचे काम पूर्ण झाल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. मात्र, आगामी पावसाळ्यात रस्त्याची स्थिती कशी राहते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

निवडक



गोशाळा जमीन व्यवहार कृषी दराने

रायगड : राज्यातील गोशाळांना मोठा आर्थिक दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यापुढे गोशाळांसाठी जमीन खरेदी, दानपत्र किंवा भाडेकरार करताना जमिनीचे मूल्यांकन व्यावसायिक, निवासी अथवा औद्योगिक दराने न करता कृषी दराने केले जाणार आहे. परिणामी, मुद्रांक शुल्क आणि इतर शासकीय शुल्कांचा मोठा आर्थिक बोजा या सेवाभावी संस्थांवर पडत होता. सरकारच्या या नव्या निर्णयामुळे हा पेच सुटला असून गोशाळांना मोठा दिलासा मिळाला आहे. गोशाळांचे कार्य केवळ जनावरांचे संगोपन करण्यापुरते मर्यादित नाही. त्यातून गोवंश संवर्धन आणि सामाजिक सेवेचे महत्त्वपूर्ण कार्य होत आहे. भटके, आजारी, वृद्ध आणि अपघातग्रस्त गोवंशाला आश्रय देण्याबरोबरच देशी गोवंशाचे जतन आणि चारा लागवडीसाठीही गोशाळा योगदान देत आहेत.गोशाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्य सरकारने आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून अधिकृत गोशाळांना चारा लागवड आणि जनावरांच्या संगोपनासाठी २५ लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गोशाळांचे आर्थिक व्यवस्थापन अधिक सक्षम व्हावे, त्यांना चारा उपलब्धतेसाठी अडचणी येऊ नयेत आणि गोवंश संगोपनाचे काम दीर्घकालीन पद्धतीने सुरू राहावे, हा या योजनेमागील उद्देश आहे.



शेलघरला कामगार संघटनेची सभा

चिरनेर : न्हावाशेवा कामगारांच्या हक्कांसाठी १९८७ मध्ये लढा उभारल्यानंतर तो दिल्ली दरबारी नेऊन जिंकला. तेव्हापासूनच खऱ्या अर्थाने मी कामगार नेता म्हणून पुढे आलो. सुमारे गेली ४० वर्षे कामगारांसाठी मी लढतोय. परिस्थितीनुरूप कामगारांच्या हक्कांसाठी अनेकांना अंगावर घेतले. अनेक गुन्हे दाखल झाले; परंतु उतणार नाही, मातणार नाही आणि घेतला वसा टाकणार नाही, या उक्तीप्रमाणे कामगारांना न्याय देण्याची भूमिका घेतलेली आहे. आजघडीला आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगारांचे प्रश्न धडाडीने मांडतोय. १०० वर्षे लढून मिळविलेले कामगारांचे कायदे आजच्या सत्ताधीशांनी पायदळी तुडवले आहेत. तरीही मी माझ्या परीने कामगारांना न्याय देतोय. वर्षाला ३०० ते ४०० नोकऱ्या आणि भरभक्कम पगारवाढ आणि बोनसचे करार करून संघटनेचा दबदबा कायम ठेवला आहे. आपल्या कामगार संघटनेची घोडदौड कार्यकर्त्यांच्या बळावर दिवसेंदिवस मजबूत होत आहे, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि न्यू मॅरिटाईम अँड जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष महेंद्र घरत म्हणाले, शुक्रवारी (या. २०) शेलघर येथे संघटनेची २१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. त्यावेळी कामगारांना संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी महेंद्र घरत यांचा जगातील सात आश्चर्ये याचि देही याचि डोळा पाहिल्याने न्यू मॅरिटाईम अँड जनरल कामगार संघटनेतर्फे सत्कार करण्यात आला. उत्कृष्ट कामगार म्हणून स्पिडीचे तुकाराम कडू यांचा, तर ध्रुव पाटील याचा उपपंचपदाची लढाई जिंकल्याबद्दल सत्कार करण्यात आला. संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत विविध विषयांवर चर्चा झाली.

उरणच्या उपजिल्हा रुग्णालयाची प्रतीक्षा कायम

उरण : उरणकरांना उपजिल्हा रुग्णालयाची प्रतीक्षा कायम आहे. वास्तविक २०१० मध्ये मंजूर झालेल्या या शंभर खाटांच्या रुग्णालयाच्या इमारतीचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री असताना केले होते. मात्र अनेक परवानग्यामुळे याचे बांधकाम रखडले आहे. सध्या किनारपट्टी नियमन क्षेत्राची मंजुरी शिल्लक असल्याचे सांगण्यात येत आहे.तालुक्यात उपजिल्हा रुग्णालयाची उपलब्धता नसल्याने रुग्णांना उपचारांसाठी खासगी रुग्णालयात जावे लागत आहे. अनेकदा या संदर्भात लोकप्रतिनिधी, प्रशासन यांच्याकडे पाठपुरावा करूनही त्याबाबत ठोस पावले उचलली जात नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या रुग्णालयाच्या उभारणीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे असून या विभागाच्या म्हणण्यानुसार रुग्णालयाच्या नवीन आराखड्याला मंजुरी मिळालेली नाही. रुग्णालयासाठी सिडकोने दिलेला भूखंड सीआरझेडमध्ये मोडत असल्याने या रुग्णालयाचा आराखडा बदलण्यात आला. नवीन आराखडा बनविण्यात आला असून या आराखड्यानुसार मंजूर भूखंडावर फक्त रुग्णालय उभारले जाणार आहे. तर कर्मचाऱ्यांसाठी निवासी संकुले बांधण्यासाठी उरण येथील इंदिरा गांधी रुग्णालयाच्या जवळचा भूखंड निश्चित करण्यात आला आहे. उरणच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या बांधकामासाठी वन विभागाच्या परवानग्या मिळाल्या आहेत. मात्र सीआरझेडची मंजुरी अद्याप मिळालेली नाही.



म्हसळा प्राथमिक शाळेस बेंच वाटप

म्हसळा : देवघर कोंड येथे राजिप शाळेला हुडको कंपनीच्या सीएसआर फंडातून पीएम श्री शाळा नं एकमध्ये वीस बेंच आणि देवघर कोंड शाळेत वीस बेंच देण्यात आले. त्याची पाहणी करण्यासाठी कंपनीचे उपमहाप्रबंधक प्रगती जाधव, शशिकांत फावडे, दिलीप सांगळे, रविंद्र लाड, अमीत महामुणकर, बाळकृष्ण म्हात्रे, महेश पाटील, अरविंद शिंदे, दिनेश कासार, कदम, बाबु शिर्के, मुख्याध्यापिका खेडेकर आणि शिक्षक वर्ग उपस्थित होते.

शिक्षकांना शासनाची तंबी

|| बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याचे आदेश|| विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान नको!

| रायगड | प्रतिनिधी |

जिल्हा परिषद शिक्षकांच्या जिल्हातंर्गत बदल्यांनंतर अनेक शिक्षक बदलीच्या नवीन ठिकाणी रुजू न होता अपिल किंवा न्यायालयीन प्रक्रियेचा आधार घेत असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला बाधा येत असल्याची गंभीर दखल घेत महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने महत्त्वपूर्ण परिपत्रक जारी केले आहे. या शासन परिपत्रकानुसार, संबंधित शिक्षक बदलीच्या ठिकाणी रुजू झाल्यानंतरच त्याच्या बदलीविषयक तक्रार अर्ज किंवा निवेदनाचा विचार केला जाणार आहे.

बदली धोरणानुसार बदलीनंतर शिक्षकाने तात्काळ नवीन शाळेवर रुजू होणे अपेक्षित असते. मात्र, बदली आदेशाविरोधात तक्रार



किंवा दावा दाखल केल्याचे कारण देत शिक्षक रुजू होत नसल्याचे प्रकार समोर आले होते. या पार्श्वभूमीवर, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचिका क्रमांक ६३९२/२०२५ मध्ये ३ नोव्हेंबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशाचा संदर्भ देत शासनाने ही कठोर भूमिका घेतली आहे. बदली आदेशास स्थगिती नसताना शिक्षक रुजू न झाल्यास बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे नुकसान होते.

रुजू झाल्यानंतरच निवेदनाचा विचार होणार. जिल्हा परिषद शिक्षकांच्या कार्यमुक्तीच्या आदेशात स्पष्ट सूचना समाविष्ट करणे बंधनकारक करण्यात आले आहे की, बदलीच्या अनुषंगाने कोणताही तक्रार अर्ज किंवा निवेदन दिले असले, तरी त्याचा विचार संबंधित शिक्षक नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू झाल्यानंतरच केला जाईल.

कार्यमुक्तीच्या दिनांकापासून संबंधित शिक्षक बदलीच्या ठिकाणी रुजू न झाल्यास, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला बाधा पोहोचत असल्याने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नियम नुसार तात्काळ शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे.

बदली आदेशाविरोधात सादर केलेल्या तक्रार अर्जांवर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने १८ जून २०२४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार ३० दिवसांच्या आत निर्णय घ्यावा. समितीच्या निर्णयावर समाधान न झाल्यास शिक्षक ७ दिवसांच्या आत विभागीय आयुक्तांकडे दाद मागू शकतील. विभागीय आयुक्तांनी तक्रार प्राप्त झाल्यानंतर शक्यतो पुढील ३० दिवसांत निर्णय घ्यायचा असून, त्यांचा निर्णय अंतिम राहील.

विभागीय आयुक्तांनी अपीलवजा तक्रारीवर निर्णय दिल्यानंतर बदलीविषयक सादर केलेली पुढील निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत, तसेच ती प्रलंबित असल्याचेही मानले जाणार नाही.सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी या सूचनांचे काटेकोर पालन करावे आणि त्या सर्व शिक्षकांच्या निदर्शनास आणाव्यात, असे निर्देश ग्रामविकास विभागाचे अवर सचिव ज्योत्स्ना अर्जुन यांनी दिले आहेत.

कामोठेत स्वच्छता कामाला सुरुवात

| पनवेल | प्रतिनिधी |

कामोठे गावात साचलेला कचरा, तुंबलेले सांडपाणी आणि वाढत्या अस्वच्छतेच्या गंभीर समस्येची दखल घेत नगरसेविका प्रिया गोवारी यांनी संबंधित प्रशासनाकडे तातडीने स्वच्छता करून सांडपाण्याचा योग्य निचरा करण्याची मागणी केली होती. परिसरातील दुर्गंधी, डासांचा वाढता प्रादुर्भाव आणि नागरिकांच्या आरोग्याला निर्माण झालेला धोका लक्षात घेऊन केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला प्रतिसाद मिळाला असून, प्रशासनाकडून स्वच्छता कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे. यावेळी जयेश गोवारी उपस्थित होते. नागरिकांच्या समस्या केवळ मांडून न थांबता, सातत्याने पाठपुरावा करून काम सुरू होईपर्यंत प्रयत्नशील राहणे, हीच आमची बांधिलकी असल्याचे सुनील गोवारी यांनी सांगितले.

निवडक



इंग्रजी माध्यमाच्या शाळेच्या इमारतीचे भूमीपूजन

नेरळ : विश्व हिंदू परिषद आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचे नाते नेरळमध्ये विद्या विकास मध्ये फेविकॉल सारखे घट्ट आहे. त्यात मुंबई मधील लक्ष्मी पुत्र यांचे वरदान यामुळे ही इमारत वर्षभरात उभी राहिलेली असेल असा विश्वास विश्व हिंदू परिषद केंद्रीय सह मंत्री दादा वेदक यांनी व्यक्त केला. विश्व हिंदू परिषद कोकण प्रांत यांचा शैक्षणिक प्रकल्प असलेल्या विद्या विकास मंडळ नेरळ यांच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा इमारतीचा भूमीपूजन सोहळा कुंभे येथे संपन्न झाला. यावेळी एकात्मता मंत्र शाळेचे शिक्षिका फणसे आणि सहस्रबुद्धे यांनी पठण केले. पाहुण्यांचे हस्ते श्री राम पूजन दीप प्रज्वलन आणि तर राम रक्षा मंत्र गायन करण्यात आले. यावेळी जेष्ठ संत विश्व हिंदू परिषद केंद्रीय सह मंत्री संतसंग विभाग दादा वेदक यांचे हस्ते कुदळ मारून इमारतीचे भूमीपूजन केले. यावेळी मुंबई येथून आलेले विनोद भगेडीया, रामचंद्र रामपाजी, राजेंद्र पवार, श्रीकांत पुराणिक, ॲड. दीपक गायकवाड,तसेच संस्थेचे अध्यक्ष शशिकांत करंदीकर, उपाध्यक्ष बल्लाळ जोशी, जिल्हा मंत्री मोहन पारटे, दिनेश रणदिवे, तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी मंडळाचे कार्याध्यक्ष प्रसन्न खेडकर, कार्यवाह अमित जोगळेकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका स्नेहा म्हसे यांनी प्रास्ताविक करताना शाळेच्या कार्याचा आढावा घेतला. संस्थेचे कार्याध्यक्ष १९८५ पासून शाळेची वाटचाल सुरू केली असून विश्व हिंदू परिषद आणि पालक यांच्या माध्यमातून ही इमारती वेगाने उभी राहील अशी खात्री यावेळी व्यक्त केली.



हरिहरेश्वरमध्ये काळभैरव अन् योगेश्वरी मातेची कोस प्रदक्षिणा

श्रीवर्धन : श्री क्षेत्र हरिहरेश्वर येथील कार्तिकी उत्सवाचे मुख्य आकर्षण असलेला पालखी सोहळा आणि कोस प्रदक्षिणा शनिवारी (दि. २१) रोजी भक्तिभावात आणि उत्साहात पार पडली. नवान्न पौर्णिमेपासून सुरू झालेला हा उत्सव त्रिपुरारी पौर्णिमेपर्यंत चालतो. या कालावधीत होणाऱ्या यात्रेच्या दुसऱ्या दिवशी झालेल्या कोस प्रदक्षिणेसाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. हरिहरेश्वराच्या राज्याचा कारभार आणि परिस्थिती पाहण्यासाठी रक्षणकर्ते श्री काळभैरव महाराज आणि आई योगेश्वरी माता पालखीतून गावात फिरतात, अशी पारंपरिक श्रद्धा आहे. या सोहळ्यानिमित्त दोन्ही पालख्या सजवून पारंपरिक पद्धतीने प्रदक्षिणेसाठी मार्गस्थ झाल्या. पर्वतरूपी पार्वती, महेश, विष्णू आणि ब्रह्म पर्वतांना वळसा घालत पालखी सोहळा पुढे सरकला. वाटेत काळेश्री मातेचे दर्शन घेतल्यानंतर हा पालखी सोहळा पुन्हा हरिहरेश्वर मंदिर परिसरात परतला. या संपूर्ण मार्गक्रमणाला कोस प्रदक्षिणा म्हटले जाते. सकाळपासूनच मंदिर परिसर आणि प्रदक्षिणा मार्गावर भजन, टाळ-मृदंगाचा गजर आणि जयघोष सुरू होता. स्थानिक ग्राम स्थांसह आसपासच्या गावांतून आलेल्या भाविकांनी शिस्त आणि स्वच्छता राखत या सोहळ्याचे दर्शन घेतले. पंचांगानुसार ठरलेल्या वेळेनुसार पूजा, नैवेद्य आणि इतर धार्मिक विधी पार पडले.



मोरे यांची तीन पुस्तके प्रकाशित

पनवेल : अरविंद मोरे यांनी सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ, व यशवंतराव चव्हाण सेंटर, अमरावती, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित ६ वे राज्यस्तरीय शब्दवेल साहित्य संमेलन २०२६ , १४ व १५ नोव्हेंबर रोजी आत्मनिर्भर, सांगायचे राहूनच गेले व आठवणीत रमताना अशी तीन पुस्तके प्रकाशित केली. याप्रसंगी साहित्यिक संमेलनाध्यक्ष इंद्रजित भालेराव, प्रा. डॉ. प्रतिभा सराफ, दिलीप इंगोले, प्राचार्य डॉ. महेंद्र मेटे, रमेश अंधारे, देशमुख, प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, डॉ. प्रमोद काकडे, पुष्पराज गावंडे, आबासाहेब कडू, प्रा. डॉ. कुमार बोबडे , डॉ. नितीन बारवकर, प्रा.डॉ. नीलिमा अरविंद मोरे, डॉ. नरेशचंद्र काठोळे, अनिल मोरे, प्रवीण बोपुलकर, प्रा. डॉ. राजेश मिरगे, देवेंद्र इंगालकर, अश्विनी अतकरे, शीतल राऊत, रामदास गायधने, बँक ऑफ महाराष्ट्रचे अरुणकुमार आठवले, रत्नाकर शिरसाठ, दत्तात्रय तारे, बद्रीनाथ पांडे, अनिल भोंडे, शशांक शिराळकर, विजय भगत व अनुप खासबागे, सुरेंद्र गावंडे, राजेंद्र वाटणे, शुभम सरदार व अक्षरशिल्पचे प्रकाशक विकास राऊत उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी


- ड्रायव्हर पाहिजे. संपर्क- ८७८८०२१५१०
- नागाव येथील हॉटेलसाठी कर्मचारी भरती रिक्त पदे : १) नाईट शिफ्टसाठी पुरूष कर्मचारी २) रिसेप्शनिस्ट ३) किचन हेल्पर (महिला) ४) मोरी कामगार ५) कॅप्टन (रेस्टॉरंट) ६) वेटर ७) ऑलराऊंडर कुक (स्वयंपाकी) कामाचे ठिकाण : नागाव, अलिबाग इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा. मो. ७५५९१८४६१२

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

माथेरानमधील महिलेची फोटोग्राफी व्यवसायाकडे झेप

| माथेरान | प्रतिनिधी |

पांडे रोड येथील रुपाली ढोले या महिलेने फोटोग्राफी क्षेत्रात झेप घेतली असून आपल्या पती समवेत शारलोट लेकवर पर्यटकांचे उत्कृष्ट फोटो काढून ताबडतोब त्याच्या कॉपी विकण्याचा व्यवसाय सुरू केला आहे. रुपाली ढोले या एक कष्टाळू महिला असून जिद्द आणि मेहनत या बळावर स्वतःच्या व्यवसायात कार्यरत राहून आपल्या कौटुंबिक आणि मुलाबाळांच्या शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी त्यांनी फोटोग्राफी हे क्षेत्र निवडले असून त्यांना या व्यवसायाच्या माध्यमातून पर्यटकांचा चांगला प्रतिसाद



मिळत आहे.

दुर्गम पर्यटनस्थळ माथेरानमध्ये अनेक सुशिक्षित तसेच पदवीधर महिला विवाह होऊन इथे आल्यानंतर त्यांना स्वतःचा काहीतरी व्यवसाय करता यावा यासाठी मार्ग सापडत नव्हता. कुटुंबाला हातभार लावण्यासाठी त्यांची नेहमीच तळमळ असते परंतु याठिकाणी कोणत्याही प्रकारची औद्योगिक इंडस्ट्री नसल्याने बहुतांश महिला आपल्या दुकानात, स्टॉल्सवर तर कुणी हॉटेल्समध्ये भाकरी बनवून देण्याचे घरगुती व्यवसाय करताना दिसतात.

महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी राजकीय मंडळींकडून काहीही हालचाली होताना दिसून येत नाहीत. उच्च शिक्षण घेऊन सुध्दा इथे शिक्षणाला साजेसे काम नसल्याने अनेक महिला आजही घरात बसून आपल्या मुलाबाळांचे संगोपन अर्थातच चूल आणि मूल यापलीकडे काहीच करू शकत नाहीत.

> वाढती महागाई आणि मुलांचे शिक्षण याचा खर्च पती किशोर ढोले यांनाच करावा लागत होता. त्यामुळे संसाराचा गाडा चालविताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. इथे नोकरी करण्यासाठी अन्य कोणत्याही प्रकारचे साधन नाही यासाठी आपण सुध्दा कुटुंबाची जबाबदारी लक्षात घेता आपल्या परीने संसाराला हातभार लावला पाहिजे या हेतूने फोटोग्राफी हे क्षेत्र निवडले असून यात पर्यटकांकडुन चांगला प्रतिसाद मिळत आहे.
> – रुपाली ढोले



प्राचार्य डॉ.विश्वास देशमुख यांना शिक्षक प्रतिभा पुरस्कार प्रदान

| धाटाव | प्रतिनिधी |

प्रा.डॉ.विश्वास देशमुख यांना लोकशिक्षक बाबा भारती प्रतिष्ठान, पिंपरी-पुणे यांच्यावतीने प्रतिष्ठेचा लोकशिक्षक बाबा भारती शिक्षक प्रतिभा पुरस्कार अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस आणि पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे विरोधीपक्ष नेते भाऊसाहेब भोईर यांच्या हस्ते आणि प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेंद्रनाथ जगन्नाथ भारती,पांडुरंग भोसले रयत शिक्षण संस्थेचे प्राचार्य महात्मा फुले कॉलेज पिपरी, यांच्या प्रमुख उपस्थित प्रदान करण्यात आला.देशमुख यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

इलेक्ट्रिक स्कूटरला लागली आग

| पनवेल | प्रतिनिधी|

पंचमुखी हनुमान मंदिरासमोर १९ नोव्हेंबर रोजी इलेक्ट्रिक स्कूटरने सुरू असतानाच अचानक पेट घेतल्याची घटना घडली.

यावेळी बीट मार्शल क्रमांक २ च्या कर्तव्यावर असलेले सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक युवराज येळे व महिला पोलीस शिपाई पूनम कसबे यांनी प्रसंगाचे गांभीर्य ओळखून क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. पाणी व अग्निशमन यंत्राचा वापर करून तत्परतेने स्कूटरला लागलेली आग आटोक्यात आणली. तसेच संबंधित स्कूटरचालकाला आवश्यक ती मदत केली.

वाहतूक पोलिसांनी दाखविलेली समयसूचकता, कर्तव्यतत्परता आणि प्रसंगावधान यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळण्यास मदत झाली. त्यांच्या या तत्पर कार्याचे घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी तसेच संबंधित वाहनचालकाने विशेष कौतुक करून वाहतूक पोलिसांचे आभार मानले. केवळ वाहतुकीचे नियमन नव्हे, तर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत धावून जाणारे पोलीस म्हणून वाहतूक शाखेने पुन्हा एकदा आपल्या कार्याचा आदर्श निर्माण केला आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये वाहतूक पोलिसांविषयी आदर आणि विश्वास अधिक दृढ झाला आहे.

आदिवासी महिलांना कायद्याचे मार्गदर्शन

| पनवेल | प्रतिनिधी |

इंडाल्को इंडस्ट्रीज लिमिटेड, तळोजा यांच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत जागृती महिला मंडळ, खारघर यांच्या संयुक्त विद्यमाने आदिवासी पाड्यातील गरीब व गरजू कुटुंबांसाठी अन्नधान्य किट वाटप आणि कायदेशीर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला गावातील महिला व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, मुलींच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे आणि बालविवाहमुक्त समाज निर्माण करण्यासाठी या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमात उपस्थित आदिवासी महिला व कुटुंबांना



अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले. तसेच महिलांचे हक्क, अधिकार, कायदेशीर संरक्षण, महिलांसाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय सुविधा आणि बालविवाह प्रतिबंधक कायदा याविषयी ॲड. संतोषी चव्हाण यांनी कायदेशीर मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना ॲड. संतोषी चव्हाण यांनी महिलांना आत्मविश्वासाने जगण्याचे आवाहन केले. महिला या केवळ कुटुंबाचा आधार नसून त्या समाजाच्या परिवर्तनाची शक्ती आहेत. स्वतःच्या हक्कांची जाणीव ठेवा, अन्याय सहन करू नका आणि आपल्या मुला-मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य द्या, असे आवाहन त्यांनी केले.

ॲड. संतोषी चव्हाण यांनी महिलांना शपथ दिली आणि मुलींच्या शिक्षणासाठी तसेच सुरक्षित भवितव्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले. यावेळी त्यांनी महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करताना सांगितले की, तुम्ही स्वतःच तुमच्या जीवनाच्या शिल्पकार आहात. तुमच्या मुलांचे भविष्य घडवण्यामध्ये तुम ची भूमिका अत्यंत मोलाची आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी शिक्षण, जिद्द आणि आत्म विश्वासाच्या जोरावर तुम्ही तुमचे आयुष्य बदलू शकता. या प्रसंगी इंडाल्को कंपनीचे सीएसआर प्रमुख लहू राऊंदळ यांनी गावातील नागरिकांशी संवाद साधला.

दगडाने मारहाण; गुन्हा दाखल

| पनवेल | प्रतिनिधी |

दारूच्या नशेत फिर्यादी सोबत भांडण करून हातामध्ये दगडाने मारहाण केल्याप्रकरणी पावसकर आणि साथीदार याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पंकज धनराज यांच्या ओळखीचा इसम पावस्कर आणि त्याचा मित्र यांनी दारूच्या नशेत त्यांच्यासोबत भांडण केले आणि पावस्कर यांनी हातामध्ये दगड पकडून त्यांना मारून जखमी केले.

माथेरानमध्ये शालेय चित्रकला स्पर्धेस प्रतिसाद!

| माथेरान | प्रतिनिधी |

शालेय विद्यार्थ्यांना आपले कलागुण प्रकट करता यावेत. त्यांच्या अंगी दडलेले कलेचे सुप्तगुण दिसावेत जेणेकरून त्यांना आपल्या कलेचा प्रसार करता यावा याच हेतूने महिला बालकल्याण समिती सभापती ऐश्वर्या निखिल शिंदे यांनी नगरपरिषदेच्या माध्यमातून येथील तिन्ही शाळेतील विद्यार्थ्यांसाठी २१ रोजी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

जवळपास १८३ विद्यार्थ्यांनी



यामध्ये आपला सहभाग नोंदवला असून त्यांना चित्रकलेसाठी आवश्यक सर्व साहित्य आणि खाऊचे वाटप सुध्दा करण्यात आले होते. असेंब्ली हॉलच्या प्रांगणात या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यासाठी प्रसिद्ध चित्रकार राजेंद्र दगडे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. यातील चांगले चित्रकार निर्माण झाले पाहिजेत यासाठी शिक्षकांचे नेहमीच प्रयत्न असतात. सकाळी ०८-३० वाजता या भव्य कार्यक्रमाला सुरुवात झाली. दहा वाजेपर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या परीने उत्तम चित्रे रेखाटली. यातील गुणवंत विजयी होणाऱ्या विद्यार्थ्यांना लवकरच पारितोषिक आणि प्रमाणपत्र देण्यात येणार असल्याचे महिला बालकल्याण समिती सभापती ऐश्वर्या शिंदे यांनी सांगितले. या कार्यक्रमास सत्ताधारी गटातील नगरसेवक,कार्यकर्ते, नगरसेविका त्याचप्रमाणे समितीच्या सदस्यांनी उपस्थिती दर्शवली. तसेच गव्हाणकर शाळेचे मुख्याध्यापक रमेश ढोले, संघपाल वाठोरे, विदुला गोसावी, शिक्षक लक्ष्मण ढेबे, सचिन भोईर, संतोष चाटसे, अमोल अंधारे, साक्षी कदम, वनिता कदम, कनिष्का रामाने, मनिषा चौधरी, प्रथमेश मोरे, मनाली रांजाणे उपस्थित होते.

कार्ड रद्द करण्यासाठी राज्यभर सह्यांची मोहीम | **१०० हून अधिक संस्था एकवटल्या**

एसटीच्या स्मार्ट कार्ड सक्तीविरोधात असंतोष

| रायगड | प्रतिनिधी |

राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून सवलतीच्या दरात प्रवास करणाऱ्या महिला, ज्येष्ठ नागरिक आणि इतर प्रवाशांसाठी नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड अनिवार्य करण्याच्या निर्णयाविरोधात राज्यभरात तीव्र असंतोष पसरला आहे. कार्ड काढताना होणारी आर्थिक लूट, नोंदणीतील अनियमितता आणि तांत्रिक अडचणींमुळे प्रवाशांना मोठ्या मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे.

या विरोधात आता महिला संघटना आक्रमक झाल्या आहेत. कार्ड काढण्यासाठी



केवळ मुदतवाढ न देता ही सक्तीच पूर्णपणे रद्द करावी, अशी ठाम मागणी महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषदेच्या नेतृत्वाखाली राज्यातील १०० हून अधिक सामाजिक संस्थांनी केली आहे.

एसटी महामंडळाकडून राज्यातील विद्यार्थी, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसह विविध ३१ घटकांना प्रवास भाड्यात सवलती दिल्या जातात. या सवलतींचा लाभ घेण्यासाठी आता नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड (एनसीएमसी) अनिवार्य करण्यात आले असून, १ ऑक्टोबरपासून कार्ड नोंदणीची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र, या सक्तीमुळे सवलतीच्या प्रवासावर अवलंबून असलेल्या महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना नव्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. कार्ड नसल्यास सवलत नाकारली जात असल्याने प्रवाशांना नाईलाजाने पूर्ण तिकीट दर मोजावा लागत आहे. आधीच लाडकी बहीण योजनेतून अपात्र ठरवण्यात आलेल्या महिलांमध्ये नाराजी आहे. त्यात आता एसटी महिला प्रवाशांचीही भर पडली आहे.

कार्ड नोंदणीच्या नावाखाली लूट

कार्ड नोंदणीच्या नावाखाली प्रवाशांकडून वेगवेगळ्या शहरांत मनमानी शुल्क आकारले जात आहे. पुण्यात प्रत्यक्षात ३०० रुपये उकळले जात आहेत, तर मुंबईत २०० रुपये घेतले जातात. यातील १८८ रुपये नोंदणी शुल्क असून उर्वरित १२ रुपये कार्ड सक्रिय करण्यासाठी आकारले जातात. मात्र, इतर ठिकाणी कार्ड सक्रिय करण्यासाठी १०१ रुपये घेतले जात आहेत.

विमा उतरविण्यासाठी १० दिवस शिल्लक

आंबा व काजू फळपीक विमा योजनेत सहभागी व्हा; जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचे आवाहन

। रायगड । प्रतिनिधी ।

पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत आंबा व काजू पिकांचा विमा उतरविण्यासाठी शेतकऱ्यांकडे आता शेवटचे १० दिवस शिल्लक आहेत. आंबा व काजू पिकांसाठी विमा योजनेत सहभागी होण्याची अंतिम मुदत ३० नोव्हेंबर असून, शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता लवकर विमा नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.





बदलत्या हवामानामुळे फळपिकांच्या उत्पादकतेवर परिणाम होऊन शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते. अशा हवामान धोक्यांपासून फळपिकांना संरक्षण मिळावे आणि नुकसान झाल्यास भरपाई मिळावी, यासाठी कृषी विभागामार्फत पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना राबविण्यात येत आहे. यावर्षी रायगड जिल्ह्यात आंबा व काजूसह नारळ आणि सुपारी या फळपिकांचाही योजनेत समावेश करण्यात आला आहे.

लोकप्रतिनिधी व कृषी विभागाच्या पाठपुराव्यामुळे यंदा आंबा पिकाचा विमा संरक्षण कालावधी १५ मे ऐवजी ३१ मे पर्यंत वाढविण्यात आला आहे. तसेच आंबा पिकासाठी शेतकऱ्यांचा विमा हप्ता प्रति हेक्टर १४ हजार ५०० रुपयांवरून कमी करून ८ हजार ५०० रुपये करण्यात आला आहे.

जिल्ह्यात आंबा पिकासाठी ६९, काजूसाठी ३८, नारळासाठी ११ आणि सुपारीसाठी ११ महसूल मंडळे अधिसूचित करण्यात आली आहेत. आंबा व काजू पिकांच्या उत्पादनक्षम फळबागांना विमा संरक्षण देण्यात येणार असून, आंबा व काजूच्या फळबागांचे वय किमान ५ वर्षे असणे आवश्यक आहे.

कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी या योजनेतील सहभाग ऐच्छिक आहे. खातेदार शेतकऱ्यांबरोबरच कुळ व भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरीही योजनेत सहभागी होऊ शकतात. मात्र, भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी नोंदणीकृत भाडेकरार विमा पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे. एका शेतकऱ्याला अधिसूचित फळपिकांसाठी किमान ०.१० हेक्टर ते कमाल ४ हेक्टर क्षेत्राचा विमा उतरविता येणार आहे.

योजनेत सहभागी होण्यासाठी अंतर्गत शेतकरी ओळखपत्र असणे तसेच ई-पीक पाहणी मोबाईल ॲपमध्ये संबंधित फळपिकाची नोंद असणे आवश्यक आहे. विमा अर्जासोबत फळबागेचा जिओ टॅगिंग असलेला फोटो अपलोड करणेही अनिवार्य आहे.

विमाधारक शेतकऱ्यांना पर्जन्यमान, तापमान, वाऱ्याचा वेग, आर्द्रता आदी हवामान घटकांमुळे निर्धारित निकषांनुसार नुकसान झाल्यास विमा भरपाई मिळू शकते. हवामानाची नोंद महसूल मंडळनिहाय स्वयंचलित हवामान केंद्रांद्वारे करण्यात येते. गारपीट किंवा वेगवान वाऱ्यामुळे नुकसान झाल्यास संबंधित विमा कंपनी अथवा कृषी विभागाला ७२ तासांच्या आत तक्रार कळविणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांनी विमा नोंदणीसाठी अंतिम मुदतीच्या वेळी होणारी गर्दी टाळून वेळेत सहभाग नोंदवावा. अधिक माहितीसाठी गावातील सहाय्यक कृषी अधिकारी किंवा कृषी विभागाशी संपर्क साधावा.साधता येईल, असे आवाहन वंदना शिंदे यांनी केले आहे.

बनोटी येथे श्री विठ्ठल-रखुमाई पालखी सोहळा उत्साहात

। म्हसळा । प्रतिनिधी ।

म्हसळा तालुक्यातील बनोटी येथील श्री विठ्ठल-रखुमाई मंदिर ट्रस्टच्या वतीने ५२ वा पालखी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या सोहळ्यास पंचक्रोशीतील असंख्य वारकरी, महिला व पुरुष भाविकांनी उपस्थित राहून विठ्ठल-रखुमाईच्या चरणी भक्तिभावाने नतमस्तक होत पालखी सोहळ्याचा आनंद घेतला. या पालखी सोहळ्यास रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा रोजगार हमी व खारभूमी मंत्री भरत गोगावले हे गेल्या तीन वर्षांपासून आर्थिक सहकार्य करीत आहेत. यंदा त्यांच्या व्यस्त कार्यक्रमामुळे त्यांना प्रत्यक्ष उपस्थित राहता आले नाही. त्यांच्या वतीने स्थानिक शिवसेना पदाधिकाऱ्यांनी सोहळ्यास उपस्थिती दर्शविली.यावेळी माजी सभापती रविंद्र लाड, अमित महामुणकर, विभागप्रमुख कांबळे, अरविंद शिंदे आणि दिनेश कासार यांची प्रमुख उपस्थिती होती.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

१९ गावांच्या समावेशाविरोधात आंदोलन

गव्हाण-वडघरचा पनवेल महापालिकेत समावेश करण्यास ग्रामस्थांचा तीव्र विरोध

। पनवेल । प्रतिनिधी ।

गव्हाण आणि वडघर जिल्हा परिषद क्षेत्रातील गावांचा पनवेल महानगरपालिकेत समावेश करण्याच्या हालचालींना १९ गावांतील ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शविला आहे. ग्रामस्थांना विश्वासात न घेता अशा प्रकारचा निर्णय लादण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पत्रकार परिषदेत देण्यात आला. विशेष म्हणजे, या वेळी सामाजिक कार्यकर्ते अजित म्हात्रे यांनी समावेशाचा घाट घातल्यास रक्तरंजित क्रांती घडवू, असा आक्रमक इशारा दिल्याने या प्रश्नाला संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले आहे.



गव्हाण आणि वडघर जिल्हा परिषद क्षेत्रातील गावांचा पनवेल महानगरपालिकेत समावेश करण्याचा ठराव महापालिकेच्या महासभेत मंजूर करण्यात आला आहे. मात्र, या प्रस्तावाला दोन्ही जिल्हा परिषद क्षेत्रांतील १९ गावांमधील ग्रामस्थांचा विरोध आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल शहरातील काश्यप हॉल येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध गावांतील ग्रामस्थांसह सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील प्रतिनिधींनी आपली भूमिका मांडली.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पनवेल शहर उपाध्यक्ष रोहन पाटील यांनीही महापालिका प्रशासनाला धारेवर धरले. गावांच्या समावेशासंदर्भात प्रशासनासमोर त्यांनी १४ प्रश्न उपस्थित केले आहेत. या प्रश्नांची केवळ औपचारिक उत्तरे न देता ग्रामस्थांचे समाधान होईल, अशी स्पष्ट आणि समाधानकारक उत्तरे प्रशासनाने द्यावीत, अशी मागणी त्यांनी केली. गावांच्या विकासाचा प्रश्न महत्त्वाचा असला तरी स्थानिक नागरिकांच्या संमतीला आणि त्यांच्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य मिळणे आवश्यक असल्याची भूमिका यावेळी मांडण्यात आली. या पत्रकार परिषदेला श्रीरामनगर येथील सुनील कटेकर, बेलपाडा येथील सामाजिक कार्यकर्ते अजित म्हात्रे, माणघर येथील मनसेचे पनवेल शहर उपाध्यक्ष रोहन पाटील, बेलपाडा येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष मधुकर कडू, कोल्ही कोपर येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे रोशन पाटील आणि बाळा नाईक, उलवे येथील सुधाकर कोळी, २७ गाव समितीचे सदस्य सुहास पाटील तसेच चिंचपाडा येथील किरण केनी उपस्थित होते.

गावांच्या समावेशाचा निर्णय घेताना स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घेणे, प्रलंबित पुनर्वसनाचे प्रश्न मार्गी लावणे आणि प्रशासनाने उपस्थित प्रश्नांवर स्पष्ट भूमिका मांडणे, या मागण्यांवर पत्रकार परिषदेत भर देण्यात आला.



सुकापूर प्रवेशद्वारावर दररोज वाहतूक कोंडी

। खांदा । प्रतिनिधी ।

पनवेल तालुक्यातील सुकापूर प्रवेशद्वार परिसरात दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे वाहनचालक आणि स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत. दुकानांबाहेर रस्त्यावर मांडण्यात येणारे सामान तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभी केली जाणारी वाहने यामुळे रस्त्याची रुंदी कमी होत असून, वाहतुकीचा पूर्णपणे खोळंबा होत आहे. मात्र, या परिस्थितीवर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा नेमकी काय करते, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

सुकापूर प्रवेशद्वार हा नेरे परिसरातील विविध गावांकडे जाण्यासाठी महत्त्वाचा मार्ग आहे. या मार्गावरून दररोज मोठ्या संख्येने दुचाकी, चारचाकी, रिक्षा आणि इतर वाहनांची ये-जा सुरू असते. मात्र, प्रवेशद्वाराजवळील दुकानांचे सामान थेट रस्त्यावर आल्याने वाहनांना मार्ग काढणे कठीण होत आहे. त्यातच रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी केली जात असल्याने वाहतुकीसाठी अत्यंत कमी जागा शिल्लक राहते.

सकाळी कामावर जाण्याच्या वेळेत आणि सायंकाळी घरी परतताना या ठिकाणी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. काही वेळा वाहनचालकांना बराच वेळ वाहतूक कोंडीत अडकून राहावे लागते. त्यामुळे नोकरदार, विद्यार्थी, व्यावसायिक आणि स्थानिक रहिवाशांना दररोज मनस्ताप सहन करावा लागत आहे. रस्त्यावर अतिक्रमण करून दुकानांचे सामान मांडणाऱ्यांवर तसेच बेशिस्तपणे वाहने पार्क करणाऱ्यांवर कारवाई का केली जात नाही? वाहतूक पोलिसांचे या समस्येकडे लक्ष आहे की नाही? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

शंकर सातमकर यांचे निधन

। चणेरा । प्रतिनिधी ।

नवखार गावातील शंकर सातमकर यांचे १५ नोव्हेंबर रोजी निधन झाले. शंकर सातमकर हे नवखार गावच्या



प्राथमिक शाळेचे पहिले स्कूल चेअरमन होते. मुंबईतील राजकमल कॉलेज टेलरिंग स्कूलचे विद्यार्थी असलेल्या सातमकर यांनी तब्बल १० लोकांना टेलरिंगचे प्रशिक्षण देऊन स्वावलंबी बनविण्यास मोलाचे योगदान दिले. त्यांचे उत्तर कार्य गुरुवारी (दि.२६) सकाळी नवखार येथे करण्यात येणार आहेत.

सत्ताधारी गटाने स्वच्छतेवर लक्ष द्यावे

। माथेरान । प्रतिनिधी ।

शहराच्या मध्यवर्ती भागात रेल्वे स्टेशन परिसरात काही वर्षांपासून कचऱ्याचे डम्पिंग बनलेले आहे. इथे सुलभ शौचालय असल्याने याचा पर्यटक मोठया प्रमाणात वापर करताना दिसतात. परंतु या शौचालयात नेहमीच पाण्याची कमतरता, नळ तुटलेले, दरवाजे मोडलेले, जंतुनाशक फवारणी नसल्याने या भागातील नागरिकांना तसेच पर्यटकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत आहे.

याकामी या प्रभागाच्या विरोधी पक्षाच्या नगरसेविका अनिता गणपत रांजाणे यांनी स्वतः नगरपालिका कार्यालयात, नगराध्यक्ष यांनाही लेखी अर्ज सादर केले होते परंतु काहीही साध्य झाले नाही. सत्ताधारी गटाने विरोधी पक्षांच्या लोकप्रतिनिधींची



■ माथेरानकरांची मागणी

कामे करायची नाहीत अशी शपथ घेतली आहे की काय असाही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे. प्रभाग सात रेल्वे स्टेशन जवळ असल्याने याभागात घरगुती लॉज आहेत तसेच अन्य प्रभागात जाण्यासाठी येथूनच जावे लागते. त्यामुळे एकीकडे कचऱ्याचा ढिगारा आणि दुसरीकडे शौचालयाच्या दुर्गंधीचा त्रास यामुळे या भागातून नियमितपणे ये जा करणारी मंडळी अक्षरशः त्रस्त झाले आहेत. जाता येता लोकांना जे काही कचऱ्याचे प्रदर्शन होत असते त्याठिकाणी दहा ते बारा फूट उंचीचे पत्रे लावल्यास याठिकाणी कचरा टाकला जाणार नाही अशी शक्यता वर्तवली जात आहे.

रस्त्याच्या कामासाठी आता पोलिसांची मदत

। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ कळंब राज्यमार्ग आणि पिंपळोली सुगवे रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे.या रस्त्याची आजूबाजूला असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीचा मोबदला शासनाकडे मागितला आहे.मात्र शेतकरी उठाव करीत असल्याने आता पोलिसांचा ससेमिरा लागला आहे.

दरम्यान शेतकऱ्यांनी पोलिसांकडे आपले म्हणणे मांडण्यासाठी रस्त्याचे काम पाहणारे विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्यासोबत बैठक लावण्याची मागणी केली आहे.

कर्जत तालुक्यातील माथेरान नेरळ कळंब या राज्यमार्ग रस्त्यावर नेरळ पासून कळंब पोहे फाटा हा रस्ता काँक्रिटीकरण केला जात आहे.या रस्त्यावर पूर्वी असलेल्या डांबरी रस्त्याच्या अधिकचे रुंदीकरण करून रस्ता बनवला जात आहे.त्यामुळे रस्त्याच्या रुंदीकरणास स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केला आहे.

रस्त्याचे भूसंपादन झाले नसताना देखील रस्त्याचे रुंदीकरण केले जात असून रस्ते विकास महामंडळ



यांनी शेतकऱ्यांच्या जमिनीचे अधिग्रहण करीत असताना अधिकची जमीन संपादित केली तर त्याचा मोबदला द्यावा अशी साधी मागणी गेल्या वर्षापासून लावून धरली आहे.

मात्र रस्त्याचे काम पाहणारे एमएसआयडीसी या संस्थेकडून शेतकऱ्यांची साधी विचारपूस देखील केली जात नाही. त्यात या विभागाचे कार्यकारी अभियंता यांचे मुंबई येथे कार्यालय असून देखील शेतकरी त्यांना भेटायला आणि आपले लेखी म्हणणे मांडून आले आहेत.

शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची तसदी देखील कार्यकारी अभियंता दाखवत नाहीत.त्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा जमीन असलेले शेतकरी संतप्त झाले आहेत.

> **मागील अनेक दिवसांपासून नेरळ कळंब रस्त्यावर सुरु असलेले काँक्रिटीकरण हे ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जात आहेत.त्यांना कोणत्याही प्रकारचे भूसंपादन करून त्याचा आर्थिक मोबदला मिळावा म्हणून प्रयत्न करीत आहे. संबंधित सरकारी कार्यालयांना लेखी निवेदने दिली असता त्या कार्यालयाकडून काहीही प्रतिसाद मिळाला नाही. राज्यात एकूण विकासाची कामे करतांना राज्यकर्ते आणि सरकारी अधिकाऱ्यांचे जनतेला विचारत न घेता बळजबरीने काम उरकण्याचे धोरण आम्ही मान्य करणार नाही.**
> **– धोंडू राणे शेतकरी,पोशीर**

शेतकऱ्यांच्या जमिनीमध्ये अनेक जुनी झाडे असून त्यांची लागवड शेतकऱ्यांनी केलेली आहे. त्यामुळे या जमिनीचे आणि झाडांचे मोबदला मिळावा अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

शेतकऱ्यांचा वाढता विरोध पाहून या रस्त्याचे काम पाहणाऱ्या बांधकाम विभागाने आता रायगड पोलिसांची मदत घेतली आहे. पोलिसांच्या बंदोबस्तामध्ये कामाला सुरुवात केली असून शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले जात नसल्याने नेरळ पासून कळंब पर्यंत रस्त्याच्या बाजूला जमीन असलेल्या शेतकरी वर्गाने नेरळ पोलिस ठाण्यात जाऊन आपली कैफियत मांडली आहे.

पोलीस अधिकारी राहुल वरोटे यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याचे कार्यकारी अभियंता यांना आपण नेरळ येथे बोलावून घेऊ आणि त्यांच्यासमोर शेतकऱ्यांना म्हणणे मांडण्याची संधी उपलब्ध करून देऊ असे आश्वासन शेतकरीवर्गाला दिले आहे.

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका यांचे कार्यालय
पत्ता : कृषी उत्पन्न बाजार समिती, सहकार नगर, मार्केट यार्ड दहिवली तर्फे निड. कर्जत, ता. कर्जत, जिल्हा - रायगड
Email ID : arcs_kjtrgd@rediffmail.com
जा.क्र. सनि ९८४/कर्जत/बी-३/का.क.२१/जाहिर नोटीस//सन २०२६ दिनांक: २०/११/२०२६

जाहिर नोटीस

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका या कार्यालयाकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०२ मधील तरतुदीनुसार खालील नमुद संस्था समापनात/ अवसायनात घेण्यांत आलेली असुन नमूद संस्थेचे सभासद,ऋणको,धनको व इतर हितसंबंधि व्यक्तींना याव्दारे कळविण्यांत येते की, खालील नमुद संस्थेवर त्यांचे नावा समोर दर्शविल्या प्रमाणे अवसायक (परिसमापक) नियुक्त करण्यांत आलेला आहे व नोंदणी रद्द करण्याबाबतची सदर संस्थेच्या अवसायनाची अंतिम कारवाई चालू आहे. त्यास अनुसरुन आपणांस कळविण्यांत येते की, खालील प्रमाणे संस्थेच्या बाबतीत नोंदणी रद्द करण्याबाबत आपले काही आक्षेप / निवेदन असल्यास संस्थेच्या नावासमोर दर्शविलेल्या अवसायकाकडे दिनांक ०८/१२/२०२६ पर्यंत सादर करावेत. सदर मुदतीत आपले म्हणणे/निवेदन/आक्षेप/दावे प्राप्त न झाल्यास सदर संस्थेची नोंदणी रद्द करण्याबाबत आपले काहीही म्हणणे नाही, असे समजून अवसायनाची कारवाई अंतिम करण्याची तसेच संस्थेची नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही या कार्यालयाकडून करण्यांत येईल. सदर संस्थेबाबत कोणाचेही दावे/आक्षेप/हरकती प्राप्त न झाल्यास सदर संस्थेचे भागधारक सभासदांची अंतिम सर्वसाधारण सभा अवसायकाच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास व वेळेत सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. कर्जत, कार्यालयीन पत्ता: मार्केट यार्ड, दहीवली, कर्जत, जि. अलिबाग-रायगड या कार्यालयात आयोजित केलेली आहे. त्यानंतर संस्था नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही करण्यांत येईल,याची नोंद घ्यावी.

अ. क्र.	संस्थेचे नांव व पत्ता	विसर्जन अधिकाऱ्याचे व पदनाम	सभा दिनांक	वेळ
१.	कर्जत प्रवासी सहकारी गृहनिर्माण संस्था, म. बामनोली, ता. कर्जत, जि. अलिबाग - रायगड	श्री. प्रसाद के. साबळे, अवसायक तथा सहकार अधिकारी श्रेणी-२	०८/१२/२०२६	सकाळी ११.००.वा.
२.	दत्तगुरु महिला सुवर्ण सहकारी पत संस्था, म.कर्जत, ता. कर्जत, जि.अलिबाग- रायगड	श्री. प्रसाद के. साबळे, अवसायक तथा सहकार अधिकारी श्रेणी-२	०८/१२/२०२६	दुपारी १२.३०.वा.

ठिकाण: कर्जत
दिनांक: २०/११/२०२६
श्री. प्रसाद के. साबळे, अवसायक तथा सहकार अधिकारी श्रेणी-२ (शिक्का)
सही/- सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत तालुका.

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग
निविदा सूचना

बँकेकरीता सन २०२७ सालाकरीता कॅलेंडर्स छपाई करून घेणेचे आहेत. कॅलेंडर्स छपाई करून घेणेकरता जिल्ह्यातील सहकारी मुद्रक संस्थांकडून तसेच संबंधित व्यावसायिकांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

कॅलेंडर्सचा सविस्तर तपशील बँकेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. ज्या निविदा धारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत त्यांनी आपल्या सिलबंद निविदा दिनांक २३.११.२०२६ ते दिनांक ०२.१२.२०२६ पर्यंत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यात.

एक किंवा सर्व निविदा नाकारणेचा अधिकार बँकेचे संचालक मंडळ राखून ठेवीत आहे.

केंद्र कार्यालय अलिबाग — सही/-
दिनांक : २३.११.२०२६ — मुख्य कार्यकारी अधिकारी

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग
निविदा सूचना

बँकेकरीता सन २०२७ सालासाठी डायऱ्या तीन प्रकारच्या नमुन्यात बँकेच्या माहितीच्या तपशिलासह छापून घ्यावयाच्या आहेत.

१. व्ही.आय.पी. एक्झीक्युटीव्ह
२. मध्यम आकाराची
३. लहान आकाराची

तरी अशा तीनही प्रकारच्या डायऱ्या, बँकेच्या माहितीच्या तपशिलासह छपाई करण्याच्या असून सदरच्या छपाईसह डायऱ्यांची निविदा मागविण्यात येत आहे. ज्या निविदा धारकांना आपल्या निविदा सादर करावयाच्या आहेत त्यांनी आपल्या सिलबंद निविदा दिनांक २३.११.२०२६ ते दिनांक ०२.१२.२०२६ पर्यंत बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे सही करणार स्वाक्षरीकार यांचेकडे सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

एक किंवा सर्व निविदा नाकारणेचा अधिकार बँकेचे संचालक मंडळ राखून ठेवीत आहे.

केंद्र कार्यालय अलिबाग — सही/-
दिनांक : २३.११.२०२६ — मुख्य कार्यकारी अधिकारी

जाहिर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल १. श्री. दिपक ब्रिज गुप्ता, २. सौ. दीपा दिपक गुप्ता यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक श्रीम. मुक्ताई सुदीप शिंदे यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मौजे गारपोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत

सर्व्हे नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू. पै.)
२८	०-५४-००	२-२५

यापैकी श्रीम. मुक्ताई सुदीप शिंदे यांचे मालकीची व हिश्याची ०-२७-०० है. आर. क्षेत्राची मिळकत

सर्व्हे नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू. पै.)
३०	१-१७-९०	१५-३७

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. २३/११/२०२६.

ॲड. नरेश रामदास आहीर.
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड- ४१०१०१.
मो.- ९३२५०६००३७/९०११२९२९८७.

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.अलिबाग
निविदा सूचना

बँकेच्या केंद्र कार्यालय व ५८ शाखांमध्ये असलेल्या फायर एक्स्टींग्वेशर (अग्निशामक उपकरणे) रिफील तसेच काही ठिकाणी नवीन उपकरणे बसविणेचे आहेत. तरी सदर क्षेत्रातील कामे करणाऱ्या मान्यवर व अनुभवी कंपन्या/प्रोपायटर यांचेकडून प्रकारनिहाय व दरनिहाय निविदा मागविणेत येत आहेत.

अ.नं.	कामाचे नाव व प्रकार
	बँकेच्या केंद्र कार्यालय व ५८ शाखांमध्ये असलेल्या फायर एक्स्टींग्वेशर (अग्निशामक उपकरणे) रिफील तसेच काही ठिकाणी नवीन उपकरणे बसविणेचे आहेत. १) DCP टाईप फायर एक्स्टींग्वेशर ५ कि.ग्रॅ. २) DCP टाईप फायर एक्स्टींग्वेशर १० कि.ग्रॅ. ३) ABC टाईप फायर एक्स्टींग्वेशर ५ कि.ग्रॅ. ४) ABC टाईप फायर एक्स्टींग्वेशर ६ कि.ग्रॅ. ५) ABC टाईप फायर एक्स्टींग्वेशर २ कि.ग्रॅ. ६) ABC टाईप फायर एक्स्टींग्वेशर ६ कि.ग्रॅ. ७) Co2 टाईप फायर एक्स्टींग्वेशर ४.५ कि.ग्रॅ.

वरील कामाच्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक ३०.११.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यात. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा अगर निविदेमधील कोणताही आयटम अगर आयटेमस् कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

केंद्र कार्यालय अलिबाग — सही/-
दिनांक : २३.११.२०२६ — मुख्य कार्यकारी अधिकारी

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

E-TENDER NOTICE

Tender Specification No. CE(C)-III/ Bhira HPS/ Rfx. No. 3000072368/2026-27.
Name of work:- Upgrading of Internal Road of Bhira Power house.

Estimated Value:- Rs. 10,32,477/- (Without GST)	**Time Limit:-** 6 Months
Sale Date:- 23.11.2026 at 11:00 Hrs to 13.12.2026 up to 17:00 Hrs.	**Tender Fee:- Rs.2360/- (Inclusive GST)**
Date of Submission:- 14.12.2026 up to 15:00 Hrs.	**EMD :-** Rs. 10,400/-

Contact person- Executive Engineer (C)(Mob-8879485202), O/o Chief Engineer (Civil) - III, M. S. P. G. Co. Ltd., Mumbai. **Fax** :(022)26581469 **Tel.No.** 022-69853619, E-MAIL ID:- cgmcivil3@mahagenco.in

For further details visit our Website https://eprocurement.mahagenco.in
Agencies are requested to register themselves for this and future E-Tenders







WISHING
HAPPY
BIRTHDAY

Alibag Municipal Council
FORMER
PRESIDENT

PRASHANT
NAIK

With Best
Compliments From

Amit Anand Nare
Gaurav Patel

Anand Builders
And Developers

Ganga Sagar Apartments, 1st Floor,
Near Collector Office, Alibag-Raigad

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)